# प्रकरण - पहिले

# प्रास्ताविक

**प्रस्तावना :-**

मनुष्य हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. म्हणून मानव निसर्गाला अधिक प्रमाणात जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. निसर्गातील निरंतर माहिती घेत असताना विश्वाचे अनेक पैलू उजेडात येत असतात. या अंगाचा अभ्यास वेगवेगळया विद्याशाखांमधून केला जातो. इतिहास या शाखेअंतर्गत इतिहास लेखनशास्त्रातून तिचे प्रस्तुतीकरण होत असते. इतिहासातून आपल्याला निरंतर माहिती मिळत असते. या माहितीच्या सहाय्याने माणूस अखंडपणे विकासासाठी धडपडत असतो. इतिहास या शब्दाचा अर्थ इति+ह+आस म्हणजे असे घडले. गत काळात जे काही घडले ते इतिहासाच्या कक्षेत सामावते. इतिहास ही मुलतः मानवी जीवनाची बहुरंगी कथा आहे. व्यक्ती, समाज, स्थळ आणि काल हे इतिहासाच्या अभ्यासाचे चार मुलभूत अनुबंध आहेत. इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता दोहोंचा वेध घेत असतो. त्यामधील अनेकदा दुर्लक्षित राहणारा घटक प्रादेशिक इतिहासामुळे उजेडात येत असतो. इतिहासाच्या अभ्यासाची चौकट विस्तारली असून संशोधक मानवी जीवनाच्या विविध आयामाचा अभ्यास वेगवेगळया पातळीवर करू लागले आहेत.

इतिहास म्हणजे केवळ राजकीय घडामोडीचा आलेख, इतिहास म्हणजे नुसत्या सनावळया, राजाची गोष्ट म्हणजे इतिहास, गतकालीन राजकारण, इतिहास म्हणजे थोरांची चरित्रे एवढयापुरता मर्यादित राहिला नाही. इतिहासाचे स्वरूप बदलून आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकास व विस्ताराचा मार्ग मानवाने कसा स्वीकारला व मानवी प्रगतीत भर पडत गेली. मराठा इतिहासलेखनामध्ये काही मोजक्या सरदारांना

त्यांच्या कामगिरीमुळे प्रसिध्दी मिळाली. परंतु काही सरदारांनी दैदिप्यमान कामगिरी केली, स्वराज्य रक्षणाची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली तरीही त्यांच्या कार्यावर म्हणावा तसा प्रकाश पडलेला नाही. काहीं सरदार दुर्लक्षित राहिले परिणामी प्रसिध्दीच्या झोतात आले नाहीत, अशा सरदारांना इतिहासलेखनाच्या मुख्य प्रवाहात आणले गेले पाहिजे.

**संशोधनाचा हेतू :-**

संशोधनासाठी विषय निवडत असताना असा विषय निवडला जातो अथवा निश्चित केला जातो की ज्या विषयाचा अद्यापपावेतो सर्वांगाने अभ्यास झालेला नाही अथवा जो विषय संशोधनासाठी म्हणून आतापर्यंत निवडलेलाच नाही तसेच ज्या विषयासंबंधी प्रकाशित व अप्रकाशित स्वरूपाची संदर्भ साधने विपुल प्रमाणावर प्राप्त होऊ शकतील असा विषय संशोधनासाठी निश्चित केला जातो. 'सरदार पाटणकर घराण्याचा इतिहास (१५१०—१८७०)' यां विषयावर अद्याप कोणीच संधोधन केलेले नाही. हा विषय आतापर्यंत पूर्णपणे दुर्लक्षित राहिलेला असून तो ज्ञात व्हावा, या उद्देशाने या विषयाची निवड करण्यात आलेली आहे. इ.स.१५१०मध्ये देशमुख म्हणून या घराण्याचा झालेला उदय आणि इ.स.१८७०मध्ये याच घराण्यातील कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झालेल्या छत्रपतींचा मृत्यू, त्यामुळे या कालखंडातील सरदार पाटणकरांनी केलेली कामगिरी, त्यांची झालेली प्रगती आणि स्थित्यंतरे याचा आढावा या संशोधनात घेण्यात आला आहे. इ.स.१८७० नंतरही आजतागायत पाटण येथे सरदार पाटणकर घराणे आपला ऐतिहासिक वारसा आणि वसा जतन करताना आपणांस दिसून येतात.

सातारा जिल्हयातील पाटण परगण्यातील पाटणकर घराणे हे इतिहासलेखनापासून वंचित राहिलेले दिसून येते. पाटणमध्ये वास्तव्य करत असल्यामुळे या घराण्याचे आडनाव 'पाटणकर' असे रूढ झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य उभारणीच्या कार्यात अनेक मराठा सरदार

घराण्यांनी मोलाची साथ दिली. अशा सरदार घराण्यांमध्ये सरदार पाटणकर घराण्यातील वंशजांनी अपूर्व योगदान दिलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीनंतर छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात उद्‌भवलेल्या संकट प्रसंगीही हे घराणे छत्रपतींशी आणि स्वराज्याशी एकनिष्ठ राहिले. अनेक सरदार घराणी स्वार्थापोटी परकीयांना जाऊन मिळाली. मात्र सरदार पाटणकर घराण्यातील वंशजांनी छत्रपतींशी एकनिष्ठता, प्रखर स्वामीनिष्ठता राखली. सरदार पाटणकर घराण्यातील वंशजांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि पेशवेकाळात स्वराज्याच्या उभारणीच्या कार्यात आणि नंतर स्वराज्य रक्षणाच्या कार्यात शत्रू सैन्याविरूध्द लढतांना जे शौर्य गाजविले त्याला इतिहासामध्ये तोड नाही. परंतु हा सर्व इतिहास अनभिज्ञ आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

पाटण परगण्यातील पाटणकर घराण्याला सुमारे साडे तीनशे वर्षाचा दैदिप्यमान इतिहास आहे. शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि पेशवे कालखंडामध्ये स्वराज्याशी हे सरदार पाटणकर घराणे एकनिष्ठ राहिले. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर परकीय शक्तीपासून स्वराज्याचे रक्षण केले. सरदार पाटणकर घराण्याचे छत्रपती घराण्यांशी संबंध, पेशव्यांशी संबंध, परकीय सत्तांशी आलेला संबंध हे अभ्यासणे गरजेचे आहे. याचा परामर्श घेण्यासाठी ‘सरदार पाटणकर घराण्याचा इतिहास (१५१०—१८७०)’ हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. संशोधनाची व्याप्ती पाटण येथील सरदार पाटणकर घराणे असले तरी या घराण्याची पार्श्वभूमी म्हणून मध्ययुगीन गुजरात आणि महाराष्ट्र तसेच या घराण्यातील पूर्वजांचा आढावा घेतला आहे.

**विषयाचे महत्त्व :-**

विज्ञानाच्या पायावर आधारलेल्या आजच्या जगातील प्रत्येक देशाचा विकास, सामाजिक प्रगती, लोककल्याण व सुरक्षितता या सर्व गोष्टी संशोधनावर अवलंबून आहेत. सरदार पाटणकर घराण्याचा स्वराज्यातील वावर आणि विस्तार याचा अभ्यास करण्याकरिता संशोधन प्रक्रिया उपयुक्त ठरते. संशोधनाने केलेल्या प्रयत्नांना शास्त्रीय बैठक प्राप्त होते. नवीन ज्ञानाचा उपयोग करून सरदार पाटणकर घराण्याचा अभ्यास केला आहे. म्हणूनच या अभ्यास विषयाचे पहिले महत्त्व हे आहे की, सुक्ष्मातिसुक्ष्म संशोधन करावयाचे असल्यास प्रत्येक घटकांचे मुल्यमापन स्वतंत्रपणेच करायला हवे. त्यांनी स्वराज्यासाठी दिलेले योगदान स्वतंत्रपणेच अभ्यासायला हवेत. तरच त्या संशोधनाला अतिसुक्ष्म स्वरूप प्राप्त होऊ शकते व अतिसुक्ष्म स्वरूप प्राप्त झाल्यानंतरच त्याचे यथायोग्य मुल्यमापन होऊ शकते, म्हणून हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१. सरदार पाटणकर घराण्यांवर संशोधन करून अशा व्यक्तींचा शोध घ्यायचा आहे की ज्यांनी स्वराज्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले आहे.

२. सरदार पाटणकर घराण्याच्या इतिहासाचे अस्तित्व आजही ऐतिहासिक व भौगोलिक स्वरूपात कायम आहेच परंतु ते लिखित स्वरूपात शब्दबद्ध करणे.

३. स्थानिक पातळीवरील नेतृत्व या अनुषंगानेही अथवा दृष्टीनेही सरदार पाटणकर घराण्यांचे कार्य अभ्यासणे हा हेतू आहे.

४. छत्रपती संभाजी महाराजांच्या निघृण हत्येनंतर स्वराज्यात मराठा समाज दिङ्मुख झाला असता स्थानिक पातळीवर सरदार पाटणकर व अन्य मराठा सरदारांनी मराठा स्वातंत्र्य लढयात महत्वपूर्ण भूमिका बजावली.

५. मराठा इतिहासात आणीबाणीच्या कालखंडातील इतिहास अभ्यासण्याच्या उद्देशाने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.
६. सरदार पाटणकर घराण्यातील कर्तृत्ववान व्यक्तींची समाजाला ओळख करून देणे.

**संशोधनाची गृहितके:**

संशोधन कार्य करत असताना उद्दिष्टाबरोबरच गृहितकेही महत्त्वाची असतात. संशोधन कार्य पूर्णत्वास येते त्यावेळी काही गृहितके सबळ पुराव्याअभावी चुकीचीही निघू शकतात. प्रस्तुत संशोधन करत असताना खालील गृहितके गृहीत धरण्यात आली होती.

१. शिवछत्रपतींच्या स्वराज्यनिर्मितीच्या स्थापनेत आणि वाढीसाठी सरदार पाटणकर घराण्यांतील पराक्रमी पुरूषांनी प्राणाची आहुती दिली.
२. मराठयांच्या स्वातंञ्ययुध्दामध्ये मराठा साम्राज्य वाढविण्यामध्ये व संवर्धनामध्ये सरदार पाटणकरांनी महत्त्वाची भूमिका बजावली.
३. छत्रपती राजाराम महाराजांकडून स्वत:च्या मागण्या मान्य करून घेतल्या आणि आपणांस पाहिजे तशी इनामे, वतने मिळविली.
४. सरदार पाटणकरांनी पाटण महालात अमुलाग्र बदल घडवून तेथील कारभार आदर्शवत ठेवला.
५. अनेक समाजोपयोगी कार्ये करून पाटण महालातील लोकांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला. तसेच उत्सवांच्या माध्यमातून संस्कृती रक्षणांचे कार्य केले.
६. सरदार पाटणकर घराण्यातील पराक्रमी पुरूष हे देशमुख पदावरून अंगच्या गुणावर व स्वकर्तृत्वावर कोल्हापूर गादीच्या छत्रपतीपदावर पोहचले.

**पूर्व संशोधनाचा आढावा:**

'सरदार पाटणकर घराण्याचा इतिहास (१५१०—१८७०)' हा विषय पूर्णपणे नवीन असून त्यावर आतापर्यंत कोणीच ऐतिहासिक संशोधन केलेले नाही. सरदार पाटणकर घराण्यावरती जे काही लिखाण झाले आहे. ते या घराण्याच्या कार्याचा विचार करता पुरेसे नाही. त्यामुळे या घराण्याविषयी प्राथमिक व दुय्यम साधनांच्या मदतीने अधिक संशोधन करून लोकांसमोर आणण्याचा माझा प्रयत्न आहे.

प्रस्तृत प्रबंधामध्ये सरदार पाटणकर घराण्यांचा इतिहास आणि त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तृत प्रबंधाचे संशोधन हे अशाप्रकारचे पहिलेच संशोधन आहे. यासाठी प्राथमिक साधन म्हणून सरदार पाटणकर घराण्याचे दप्तर, कोल्हापूर पुराभिलेखागार पाटणकर दप्तर, पुणे पुराभिलेखागार, मुंबई पुराभिलेखागार येथील दप्तरांचा वापर केला आहे. तसेच श्री.विक्रमसिंह पाटणकर, श्री.सत्यजित पाटणकर, श्री.याज्ञसेन पाटणकर, श्री.अमरसिंह पाटणकर या सरदार पाटणकर घराण्यांतील वंशजांच्या प्रत्यक्ष मुलाखतींचा वापर केला गेला आहे. तर सरदार पाटणकर यांसंबंधी अभ्यास करताना श्री. सुनिल दापुरकर, प्रा. डी. डी.चव्हाण यांच्या पूर्वलेखनाचाही अभ्यास केला आहे.

संशोधन प्रकल्पाची एकूण सहा प्रकरणात विभागणी केली आहे.

**प्रकरण पहिले**

पहिल्या प्रकरणात प्रस्तावना, संशोधनाचा हेतू, संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा सांगून संशोधनाचे महत्व स्पष्ट केले आहे. सरदार पाटणकर घराण्यांचा पूर्वइतिहास व घडलेल्या घटनांची माहिती दिली आहे. सरदार पाटणकर यांचा पाटण परगणा येथे झालेल्या स्थलांतरांचा

आढावा घेण्यात आला आहे. सरदार पाटणकर घराण्यांतील कर्तबगार व्यक्तींच्या कार्याचा परिचय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच सरदार पाटणकर घराण्यांच्या विविध शाखांचा आढावा घेण्यात आला आहे.

**प्रकरण दुसरे**

शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांच्याशी सरदार पाटणकरांचे असलेले संबंध अधोरेखित करण्यात आलेले आहे. सातारा आणि कोल्हापूर राज्यगाद्यांशी सरदार पाटणकर घराण्याचे असलेल्या संबंधांविषयी संशोधन करून माहिती उजेडात आणण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरण तिसरे**

तिसऱ्या प्रकरणामध्ये सरदार पाटणकर आणि पेशवे संबंध यांवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. सरदार पाटणकर यांचे बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे, माधवराव पेशवे, नारायणराव पेशवे, सवाई माधवराव पेशवे आणि दुसरे बाजीराव पेशवे यांच्याशी असलेल्या संबंधाचा संशोधनपर आढावा घेतला आहे.

**प्रकरण चौथे**

चौथ्या प्रकरणात मराठी सत्तेच्या पाडावानंतर ब्रिटीशांशी असणारे सरदार पाटणकरांचे संबंध व सरदार पाटणकर यांनी केलेली समाजोपयोगी कामे यांचा संशोधनपर आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रकरण पाचवे**

पाचव्या प्रकरणात सरदार पाटणकर घराण्यातून कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेलेले नागोजीराव पाटणकर ऊर्फ छत्रपती राजाराम

महाराज यांच्या जीवन व कार्यावर संशोधनपर माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रकरण सहावे**

या प्रकरणात प्रबंधाचा उपसंहार दिला आहे.

शेवटी संशोधनात वापरलेल्या प्राथमिक, दुय्यम संदर्भग्रंथाची सूची, मुलाखती अशा साधनांची यादी तसेच परिशिष्टांमध्ये पत्रे, सरदार पाटणकरांचे वाडे, विविध नकाशे, समर्थ रामदास स्वामी यांनी सरदार चांदजीराव पाटणकरांना दिलेली पट्टाभिरामचंद्राची पंचरस धातूची मूर्ती, छत्रपती राजाराम महाराज यांची फ्लॉरेन्स येथील समाधी याचा समावेश करण्यात आला आहे.

**प्रास्ताविक :-**

सरदार पाटणकर घराण्याचा इतिहास नेमका किती वर्षे मागे जातो हे पाहत असता असे लक्षात येते की, इ.स.पूर्व तिसऱ्या शतकात मगध देशांतील पाटलीपुत्र नामक नगरींत मौर्य या उपनावांचे राजे होऊन गेले. त्या कुलांतील सम्राट अशोकांने विविध ठिकाणी शिलालेखाची निर्मिती केली. त्यातील एका शिलालेखात असे म्हटले आहे की, ‘आम्हीं राष्ट्रिक, पेटेनिक, अपरान्त हया देशीं धर्मोपदेशक पाठविले आहे’[१]. हयांतील अपरान्त देश म्हणजे उत्तर कोंकण, पेटेनिक म्हणजे पैठण व राष्ट्रिक म्हणजे महाराष्ट्रातील लोक. ज्यांस रट्ट असं म्हटले आहे. ते रट्ट लोक ज्यांची दक्षिणेमध्ये फार प्राचीन काळापासून सत्ता होती व जे आपणांस राष्ट्रकूट म्हणवीत होते. याच रट्ट वंशीयांकडून चालुक्य वंशीयांनी राजसत्ता मिळविली. तत्कालिन महाराष्टामध्ये रट्ट व भोज घराण्याची सत्ता होती. त्यांच्या सत्तेखाली चोल, पांडय, केरल, आन्ध्र, पुलिंद हया लोकांनी राज्ये स्थापिली होती, असे अशोकाच्या शिलालेखातून दिसून येते.[२] मौर्य सम्राट अशोकांने

काठेवाडांत आपली सत्ता प्रस्थापित केलेली होती. परंतु राष्ट्रिक, भोज, पेटेनिक, चोल, पांडय यावर त्याची सत्ता नव्हती, असे दिसून येते.

मौर्यवंशानंतर शुंग घराण्याची सत्ता स्थापना झाली व त्यांनी सुमारे ११२ वर्षे राज्य केले.[३] नंतर कण्व राजांनी राज्य केलेले दिसून येते. सातवाहन राजांनी आपली सत्ता इ.स.पूर्व ७३ ते इ.स. २३० पर्यंत उपभोगिली.[४] या घराण्यातील राजांच्या काळात शक घराण्याच्या हाती काही काळ दक्षिण भाग गेलेला होता. या दोन घराण्यानंतर क्षत्रप या कुलानेही काही वर्षे राज्य केले. या सर्व घराण्यांच्या सत्ताकालखंडामध्ये रट्ट व भोज हे आपले अस्तित्व टिकवून होते. परंतु सातवाहन व क्षत्रप या घराण्यांच्या विनाशानंतर रट्टकूड, राठोड, राष्ट्रकुट हया उपनावांच्या राजेरजवाडयांनी पुनः स्वातंत्र्य धारण केले. राष्ट्रकुट घराण्याने महाराष्ट्रावर सुमारे २४५ वर्षे राज्य केले.[६] या राष्ट्रकुट घराण्यातील कृष्ण नामक राजाचा पुत्र इंद्र यांस पराभूत करून जयसिंह याने चालुक्य वंशाची स्थापना विजापूर जिल्हयातील बदामी येथे इ.स. सहाव्या शतकाच्या आरंभी केली.[५] चालुक्य कुलाची स्थापना ज्याकाळी झाली, त्याकाळाबद्दलची अधिक माहिती उपलब्ध नाही.

चालुक्य वंशाचा इतिहास निश्चित होण्यास ताम्रपट व शिलालेख जे काही सापडले आहेत ते कारणीभूत झालेले आहेत. बिल्हण याच्या 'विक्रमांकदेवचरित' या काव्यात चालुक्य वंशाची उत्पत्ती दिसते.[७] तसेच येतूर येथील शिलालेखांत व मिरज येथील ताम्रपटांतील लेखांतही चालुक्य वंशाचे वर्णन केलेले दिसते. या चालुक्य वंशामध्ये अनेक पराक्रमी राजे होऊन गेले. रणराग, पहिला पुलकेशी, पहिला कीर्तिवर्मा, मंगलेश, द्वितीय पुलकेशी असे क्रमाने राजे गादीवर आले. या सर्व राजांनी 'सत्याश्रय श्रीपृथ्वीवल्लभ महाराज' ही पदवी जोडून घेतली.[८] 'सत्याश्रय' म्हणजे सत्याचा आधार व कित्येंकाच्या नावामागे 'पृथ्वीवल्लभ' ही पदवी जोडलेली आहे. पृथ्वीवल्लभ म्हणजे पृथ्वीचा पती. द्वितीय पुलकेशी याने तत्कालिन बलाढय कनोजचा राजा

हर्षवर्धन याचा नर्मदेच्या किनारी पराभव केला. हर्षवर्धनाचा पराभव केल्याबद्दल सर्वत्र चालुक्य वंशाला महत्त्व प्राप्त झाले.

द्वितीय पुलकेशी राजाच्या कारकीर्दीत हूएनत्संग नावांचा चीन देशांतील प्रवासी इ.स. ६३९मध्ये भारतात आला होता. प्रवास करीत करीत तो महाराष्ट्रात आला. त्याने महाराष्ट्राचा उल्लेख 'मोहोलाक्ख' असा केलेला आहे. तो द्वितीय पुलकेशी याला भेटला होता. तो आपल्या ग्रंथात असे म्हणतो की, 'तो (पुलकेशी) 'त्सतलि' (क्षत्रिय) ज्ञातीपैकी आहे. त्याचे नाव 'पुलोकिशे' त्याचे विचार प्रगल्भ आणि गंभीर आहे आणि त्याला पर—दु:खाविषयी कळवळा होता. तो परोपकारी होता. त्याचे राज्य फार विस्तीर्ण आहे. सांप्रत महाराज शिलादित्य (हर्षवर्धन) आपले विजयी सैन्य घेऊन पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत स्वाऱ्या करीत आहे. तो दूरदूरच्या राष्ट्रांतील लोकांस जिंकून त्यांवर आपला अंमल बसवित आहे आणि आपल्या शेजारच्या राष्ट्रांतील लोकांच्या मनांत आपणांविषयी दहशत रहावी असे करीत आहे. परंतु हया राज्यांतील (महाराष्ट्रातील) लोक मात्र त्यास शरण गेले नाहींत. त्या लोकांस पुरें शासन करावे म्हणून त्यानें वारंवार स्वकीय राज्याच्या पांचही भागांमधील सैन्य एकत्र केलें. सर्व राज्यांतील शूर सेनानायकांस पाचारण करवून आणविलें, आणि आपलें सैन्य बरोबर घेऊन त्यावर स्वाऱ्या केल्या. तथापि त्यांना पूर्णपणे जिंकून त्यांनी पुन: कधींही वैरभावाने मानसुध्दा वर उचलू नये असे करणे, त्याच्या हातून कदापी झाले नाही. हया गोष्टीवरून त्या लोकांस (महाराष्ट्रीयांस) शिपाईगिरीचा अभ्यास व सवय किती आहे'[१], हयाविषयी असे अनुमान काढता येते की द्वितीय पुलकेशीचे सैन्य व युध्दनीती विकसित होती, हे दिसून येते.

हयूएनत्संग आपल्या ग्रंथामध्ये तत्कालिन महाराष्ट्राचे वर्णन पुढीलप्रमाणे करतो,

'त्या राज्याचा (महराष्ट्राचा) परीघ ६००० मी. (१२०० मैल) होता आणि एकटया राजधानीचा परीघ ३०मी. (६ मैल) होता व त्या राजधानीचे पश्चिम अंग एका मोठया नदीच्या काठी होते. त्या मुलखांतली जमीन उत्कृष्ट असल्याने तेथे धान्य विपुल उत्पन्न होत होते. तेथील हवा उष्ण आहे. रीतिरिवाज साधा व प्रामाणिकपणाचा आहे. देशीय लोक बांध्याने उंच, स्वभावाने मगरूर व तोरेदार आहेत. जो कोणी त्यांच्या काही तरी उपयोगी पडतो, त्याने त्यांच्या कृतज्ञतेविषयी खुशाल भरंवसा ठेवावा, परंतु ज्या कोणाकडून त्यांना राग येण्याजोगे काही तरी घडते, त्याचा सूड उगविल्यावाचून ते कधीही राहणार नाहीत. कोणी त्यांचा उपमर्द केला, तर तो अपमानाचा डाग घालविण्यासाठी ते आपले प्राणही धोक्यात घालतील. संकटांत सापडलेल्या कोणीही त्यांस हाक मारिली, ता ते ताबडतोब धाव घेतील, त्यावेळी आपले काय होईल याचा ते विचारही करणार नाहीत. एखादया अपकाराबद्दल आपल्या शत्रूचा सूड घ्यावयाचा असल्यास 'सावध रहा' म्हणून पूर्वी सूचना करावयास मुळींच चुकत नाहीत. सूचना करून नंतर प्रत्येकजण चिलखत चढवितो आणि भाला हाती घेतो. लढाईत शत्रू पळ काढतील, तर त्यांच्या ते मागे लागतात, परंतु जे शरण येतील त्यांस ठार मारीत नाहीत. एखादया सेनापतीने युध्दात डाव गमविला तर त्याला शरीरदंड न करतां, ते त्यास बायकांची वस्त्रें नेसावयास लावतात, त्यायोगे त्यास आपण होऊनच जीव देणे प्राप्त होते. ज्यांस जीवाची भीती म्हणून कसलीच नसते. त्यांच्या पुढे कोणा शत्रूच्याने टिकाव धरवत नाही. येथील राजाला हे असले शूर लोक व हत्ती आपल्या पदरी आहेत म्हणून मोठा गर्व आहे व तो त्यांच्या बलावर शेजारची राज्यें कसपटासारखी मानून त्यांची हेटाळणी करतो',[१०] यावरून तत्कालिन महाराष्ट्र व महाराष्ट्रीयांविषयी आपणांस माहिती मिळते.

प्रामुख्याने चालुक्य काळाचे दोन भाग पडतात. १) पूर्वकालीन चालुक्य अंदाजे इ.स. ४५० ते ७००पर्यंत व २) उत्तरकालीन चालुक्य अंदाजे इ.स. ९०० ते १२५० पर्यंत. पुलकेशी पहिले, सम्राट पुलकेशी

दुसरे, विक्रमादित्य यांसारखे राजे पूर्वकालीन चालुक्य राजवंशाची इतिहासात नोंद आहे. तसेच उत्तरकालीन चालुक्य कालखंडात राजे तैलप, राजे जयसिंह, राजे सोमेश्वर, राजे मंगलीश, राजे आयनदेव, राजे विक्रम, राजे सोमदेव, राजे कर्ण वाघेल यांसारखे राजे चालुक्य वंशात होऊन गेले.[११] या राजांची राज्ये दक्षिण व पश्चिम भारतात गुजरात, राजस्थान व महाराष्ट्र या ठिकाणी होती. बदामी, वेंगी, कल्याणी, अन्हिलवाडा ही त्यांच्या राजधानीची प्रमुख ठिकाणे होती.[१२] दक्षिण भारताचे वैभवशाली पराक्रमी राजे म्हणून चालुक्य राजवंशाची इतिहासात नोंद आहे.

चालुक्य वंशाचा इतिहास पुढे १२व्या शतकापर्यंत दिसून येतो. प्रत्येक राजांनी आपआपल्या परीने चालुक्य घराण्याची भौगोलिक सीमा वाढविण्याचा व टिकविण्याचा प्रयत्न केला. परंतु कालाच्या ओघात इतर ऐतद्देशिय सत्ता हया बलाढय होत गेल्या व चालुक्य सत्ता कमकुवत होत गेली. इ.स. १२९७ मध्ये दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याने अलफखान व वजीर नुसरतखान यांजबरोबर १,००,००० स्वार, ३,००० पायदळ, १,५०० हत्ती आणि ४५ लहान मोठे अंमलदार देऊन चालुक्य राज्य काबीज करण्यास पाठविले.[१३] त्यावेळी चालुक्य राजा कर्ण वाघेल हा गादीवर होता. सुलतानाच्या सैन्यापुढे कर्ण राजाचा टिकाव लागला नाही. तो आपले राज्य सोडून पळून गेला. तो देवगड राजाच्या आश्रयी गेला. पुढे दिल्लीचा सुलतानाने मलिककाफूर यास देवगडवर पाठविले. तेव्हा कर्ण तेथून गुप्तपणे निसटून दंतगिरीवर आला. तो आयुष्याच्या शेवटी आसपासच्या शेतकऱ्याप्रमाणे शेतकी व पाटीलकी करून जीवन जगू लागला. त्याने आपले पूर्व नाव चालुक्य ऊर्फ सोळंखी हे सोडून साळुंखे म्हणवू लागला. येणेप्रमाणे गुजरातमधील चालुक्य शाखेचा अस्त होऊन चालुक्य घराणे पुनः आपल्या मूळ भूमीस येऊन साळुंखे या नावाने ओळखू लागले. [१४]

चालुक्य राजांनी आपल्या राजवटीत धर्म, संस्कृती व लोककल्याण यांना विशेष महत्त्व दिले. चालुक्य कालखंडातील शिल्पकला, सौंदर्यकला, नक्षीदार मंदिर कलेचे अनेक उत्कृष्ट नमुने आजही आपल्याला महाराष्ट्रात विशेषत: दक्षिणेत पहावयास मिळतात. काही इतिहासकालीन प्राचीन गुहांमध्ये हे चालुक्यकालीन सुंदर शिल्पांचे उत्कृष्ट नमुने आहेत. उदा. पुण्याजवळील श्री भुलेश्वर मंदिर.[१५] याच कालखंडात जगप्रसिध्द अजंठा व वेरूळ येथील लेणी खोदली गेली.

चालुक्य पूर्वापार मूळ वंशवेलीतील काही घराणी ही गुजरात व महाराष्ट्रात आली व काही दक्षिणेतच राहू लागली. राजा कर्ण वाघेल दंतगिरीच्या आसपास राहू लागले आणि तेथे शेती व गावपाटीलकी करू लागले. चालुक्य राजा कर्ण वाघेलनंतर १३व्या शतकाच्या अखेरपर्यंत ते अंदाजे १६व्या शतकाच्या मध्यापर्यंत म्हणजे नागोजीराव साळुंखे यांच्यापर्यंतची माहिती अज्ञात आहे. त्यासंबंधी कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

**सरदार पाटणकर घराण्याचा संक्षिप्त इतिहास:**

**१) नागोजीराव साळुंखे:**

१३व्या शतकाच्या मध्यास भारतावर इस्लामी शासकाचा अंमल पूर्णपणे बसला होता. अनेक मोठमोठी घराणी शेतकी व पाटीलकी करून आपले जीवन व्यतित करीत होते. तसेच कित्येक सरदार इस्लामी शासकांच्या दरबारी राहून सामर्थ्य दाखवित होते. १४व्या शतकात नागोजीराव साळुंखे यांनी दिल्लीच्या सुलतानाचा पक्ष घेणाऱ्या लोकांचा व इतर लहानमोठ्या बंडवाल्यांचा मोठ्या शर्थीने बिमोड केला आणि स्वत:च्या शौर्य पराक्रमाच्या जोरावर बहामनी सुलतानाकडून पाटण महालातील दंतागिरी (दातेगड) आणि गुणवंतगडची (मोरगिरी) देशमुखी मिळविली. पाटणच्या वायव्येस १० किमी. वर शंभूमहादेवाच्या डोंगररांगा आहेत. या गडास सुंदरगड,

हातेगड अशीही नावे आहेत. याला पूर्वी दंतागिरी असेही नांव असावे कारण सरदार नागोजीराव साळुंखे यांना बहामनी सुलतानाने दंतागिरी व गुणवंतगडची देशमुखी इ.स. १५१०मध्ये दिली व या गडांची व्यवस्था ते पहात असल्याचा उल्लेख सापडतो.[१६]

सुंदरगड ऊर्फ दातेगड हा गड पायथ्यापासून २०००फूट उंचीवर आहे. हा गड साधारणपणे आयताकृती असून लांबी अंदाजे ६०० फूट तर रूंदी १८० फूट आहे.[१७] गडाला चारही बाजूस नैसर्गिक तट असून दक्षिण तट बांधकाम करून अधिक मजबूत बनवला आहे. या गडावर अंखड खडकात खोदलेली विहीर आहे. ही विहीर मूळ चौकोनी आहे. पण नंतर तिला मुठीसह तलवारीचा आकार दिल्याने विहीरीचा आकार दक्षिणोत्तर वाटतो. या आकारातील मूठ उत्तरेस व पाते दक्षिणेस आहे.[१८] पात्याच्या बाजूने अखंड खडकात खोदलेल्या एकूण ४१ पायऱ्या आहेत. त्यापैकी ४ ते ५ पायऱ्या ढासळलेल्या आहेत.[१९] विहीरीच्या मध्यभागी पश्चिम भिंतीत एक महादेवाचे छोटेसे मंदीर खोदलेले आहे. त्याचा आकार ८ फूट लांब व ७ फूट रूंद व ६ फूट उंच आहे.[२०] या विहीरीच्या दक्षिणेस खडकात खोदलेली गणपती व मारूतीची देवालये आहेत.[२१] खडकात चौकोनी आकाराच्या खोदकामात उत्तर भिंतीत दक्षिणाभिमुख गणपती व पूर्व भिंतीवर पश्चिमाभिमुख मारूती अशा मूर्ती आहेत. या मूर्तीपर्यंत जाणेसाठी पश्चिमेकडून पायऱ्या केलेल्या आहेत. विहीरीच्या उत्तरेस काही अंतरावर पाच टाक्या आहेत.[२२] त्यापैकी काही अजूनही सुस्थितीत आहेत. इतिहासकालीन दातेगडाची व्यवस्था, त्याचा कारभार, तेथील अधिकारी व त्यांचा कालखंड वगैरे बाबत फारशी माहिती उपलब्ध नाही. शिवकाळात या गडाचे आसपासच्या भागात मोठे युध्दही झाले नसावे. केवळ पाटण महालाचे संरक्षण करणेसाठी त्याकाळचे आवश्यक साधन म्हणून या गडाचा वापर सरदार पाटणकरांनी केला असेल अशी शक्यता वाटते. इतिहास संशोधक वा.सी.बेंद्रे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी वसविलेल्या १०८ गडांची यादी दिलेली आहे त्या यादीत या गडाचा समावेश आहे.

गुणवंतगड हा गड पाटण तालुक्याच्या ठिकाणापासून नैऋत्य दिशेस अंदाजे ५ कि.मी. अंतरावर आहे. या गडाचा आकार पठारावर मोठा दगड ठेवल्यासारखा आहे. गडाची लांबी साधारणपणे पाऊण किमी तर रूंदी सरासरी ६ मीटर आहे.[२३] या गडावर पूर्वीच्या घरांचे काही अवशेष व एक विहीर आहे. एका ठिकाणी अर्धवट खोदलेली गुहा आहे.[२४] या गडावर फार मोठी युध्दे झालेली नाहीत. मात्र छत्रपती राजाराम महाराजांनी इ.स. १६९०साली हा गड सरदार पाटणकरांना दिल्याचा उल्लेख इतिहासात आहे.[२५] या गडाचा वापर फक्त टेहळणीसाठीच केला जात असावा असे वाटते कारण या गडावरून चारी बाजूंचा प्रदेश सहज दिसतो.

**२) जोत्याजीराव साळुंखेः**

सुलतान युसुफ आदिलशहाने विजापूरच्या राज्याची स्थापना केली त्यावेळेस त्याच्या ताब्यात निरा नदीपासून घटप्रभा नदीपर्यंत व पश्चिमेस समुद्र किनाऱ्यावरील बाणकोटपासून रामसपर्यंत कोकणपट्टी, पूर्वेकडे रायचोर, इदगीर, बेदर आणि मलकर हे चार परगणे इतका मुलूख होता.[२६] हया राज्याचे उत्तरेस अहमदनगरचे राज्य होते. विजापूरच्या सुलतानाचे राज्य महाराष्ट्रात असल्यामुळे दरबारी मराठा लोकांचा मोठा भरणा होता. मोठमोठे मानकरी, अमीर उमराव वगैरे यात मराठे लोकांचा समावेश होता. त्यापैकी जावळीचे चंद्रराव मोरे, फलटणचे निंबाळकर, मलवडीचे झुंजारराव घाटगे, म्हसवडचे रावमाने, जतचे डफळे, सावंतवाडीचे सावंतबहादूर, वाडीचे देशमुख, भोसले वगैरे सरदार प्रमुख होते.[२७] इ.स. १५१०चे सुमारास पोर्तुगीज लोक भारतात येऊन गोवा प्रदेश हस्तगत केला.[२८] हा प्रदेश विजापूरच्या सुलतानाच्या ताब्यात असल्याने त्याने पुन्हा या प्रदेशावर हल्ला करून हा प्रदेश ताब्यात घेतला होता. पुन्हा काही वर्षांनी पोर्तुगीजांनी गोवा व आसपासचा प्रदेश ताब्यात घेतला होता.

इ.स.१५७२चे सुमारास पोर्तुगीज लोकांनी बाणकोटापासून गोव्यापर्यंत किनारपट्टीवर लुटालूट व जाळपोळ आरंभिली. तेव्हा विजापूरचा सुलतान व अहमदनगरचा सुलतान या दोघांनी चौल व गोवा हया प्रदेशांना वेढा दिला. यावेळी दंतागिरीचे देशमुख सरदार नागोजीराव साळुंखे यांचे पुत्र जोत्याजीराव आपल्या पाचशे स्वारांसह या मोहिमेमध्ये सामील होते.[२९] कालांतराने विजापूरच्या सुलतानाने वेढा उठविला. पुढे वारणेच्या पलीकडे काही डोंगरी मुलूखात रामोशी वगैरे लोक सरकारी सारा न देता नेहमी दरोडे घालून लोकांना त्रास देत असत. तेव्हा जोत्याजीराव साळुंखे यांनी विनंती केली की, ‘मी तिकडे जाऊन बंदोबस्त करितो’. तेव्हा सुलतानाने खूष होऊन जोत्याजीराव साळुंखे यांना पाटण महालांतील साठ गांवची देशमुखी वतनाची सनद जोत्याजीराव साळुंखे यांस देऊन त्यांना तिकडील मुलूखाचा बंदोबस्त करण्याकरितां पाठविले.[३०] या नव्या वतनामुळे त्यांना व त्यांचे पुढील वंशजांस ‘पाटणकर’ असे म्हणू लागले व त्याच उपनावाने आजही ते ओळखले जातात. या नव्या देशमुखी सनदेमुळे जावळीचे मोरे आणि सरदार पाटणकर यांच्यात वितुष्ट आले. ही सनद पसंद न पडल्याने जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांनी जोत्याजीरावांवर हल्ला करण्याचा विचार केला होता. ही गोष्ट जोत्याजीरावास कळताच त्यांनी विजापूरच्या दरबारातून चंद्ररावांना एक आज्ञापत्र परभारे पाठविण्याची तजवीज केली होती व त्यांचे मनातील मत्सरभाव दूर करण्याचा प्रयत्न केला होता.[३१]

इ.स. १५९० मध्ये दिल्लीचा बादशहा अकबर याने दक्षिणेतील सर्व इस्लामी राज्ये बुडविण्यासाठी आपल्या सरदाराबरोबर मोठे सैन्य रवाना केले. त्या सरदारांने खानदेश वगैरे मुलूख काबीज करून अहमदनगरला वेढा दिला. तेव्हा आपल्या राज्याचा बंदोबस्त करण्यासाठी विजापूरच्या सुलतानाने आपल्या सरहद्दीवर ठिकठिकाणी सैन्य पाठवून बंदोबस्त केला. जोत्याजीराव पाटणकर यांची दोन हजार स्वारांच्या पथकावर ‘इदर’ या

परगण्यावर नेमणूक झाली होती.[३२] येथे जोत्याजीराव पाटणकर यांनी मोठा पराक्रम करून संरक्षण केले होते.

**३) बहिरजी साळुंखे ऊर्फ पाटणकर:**

मोगल साम्राज्याचा विस्तार होत त्याची हद्द विजापूरच्या राज्यापर्यंत येऊन भिडली. अहमदनगरचे फत्तेखानाचे राज्य समूळ नष्ट करण्याकरिता मोगलांनी काही शर्तीवर विजापूरकरांची मदत घ्यायचे ठरविले होते. मोगलांना मदत म्हणून रणदुल्लाखान यांजबरोबर सैन्य देऊन मोगलांचे मदतीस पाठविले. जोत्याजीरावानंतर त्याचा पुत्र बहिरजीराव याने सैन्याचे नेतृत्व केले. तेव्हा रणदुल्लाखानाने मोगलांकडे धारवाड किल्ला व आणखी मुलूख आणि सोलापूरचा किल्ला द्यावा, अशी मागणी केली. परंतु मोगली सैन्याने किल्ला व आसपासचा मुलूख देण्यास नकार दिला. यादरम्यान अहमदनगरच्या सुलतानाकडून सोलापूर किल्ला विजापूरकरास मिळाला. तेव्हा मोगलांचा पक्ष सोडून अहमदनगरकरांस मिळण्याच्या बेतांत बहिरजी पाटणकर होते. मोगलाविरोधात त्यांनी मोठा पराक्रम दाखविला परंतु रणदुल्लाखानाच्या हयगयीने मोगल लोकांना यश मिळाले.[३३]

राजश्री बहिरजीराव व त्यांचे पुत्र हिरोजीराव हे दोघे विजापूर दरबारी असत.[३४] दिल्लीचा बादशहा शहाजहान याने इ.स. १६३५मध्ये अहमदनगरचे राज्य जिंकले[३५] परंतु शहाजी भोसलेमुळे त्यांना त्या प्रांताचा वसूल सुरळीत मिळेना. तेव्हा शहाजहान बादशहाने विजापूरच्या दरबारी आपला वकील पाठवून शहाजीचा पक्ष सोडावा आणि अहमदनगरच्या राज्यातील घेतलेले सर्व किल्ले परत दयावेत म्हणजे सोलापूर किल्ला तुमच्याकडे राहून तुमची राज्यसीमा कायम करावी, असे सांगितले.[३६] ही मागणी विजापूरच्या बादशहाने मान्य केली नाही. तेव्हा मोगलांनी विजापूरवर चाल केली. नलदुर्ग, सोलापूर प्रांत जिंकून त्यांनी आपली छावणी मिरज व कोल्हापूर परिसरात ठेवली.[३७] सरदार बहिरजीराव पाटणकर व त्याचे पुत्र हिरोजीराव पाटणकर

यांच्यासमोर मोठे संकट उभे राहिले. त्यावेळी बहिरजीरावांनी मोगलाबरोबर लढण्याकरिता विजापूरच्या सैन्यात जावे आणि हिरोजीरावाने काही लोकांनिशी पाटण महालांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करावा,[३८] असे ठरले गेले. पाच हजार सैन्य घेऊन सरदार बहिरजी पाटणकर मोठा पराक्रम करत होते तर रामोशी समाजाला मदतीला घेऊन सरदार हिरोजीराव पाटणकर पाटण महालांतील प्रजेचे संरक्षण करीत होते.[३९]

**४) हिरोजीराव पाटणकर:**

इ.स.१६५६ मध्ये विजापूरच्या गादीवर अली आदिलशहा तख्तारूढ झाला. त्यावेळी मोगल बादशहाने आपला वजीर मीरजुमला याला मोठे सैन्य घेवून विजापूर वर हल्ला करण्यास पाठविले.[४०] औरंगजेब स्वत: या स्वारीत होता. तेव्हा सर्जेराव घाडगे, बाजी घोरपडे व हिरोजीराव पाटणकर[४१] वगैरे मराठे सरदार आपआपले सैन्य घेवून विजापूरच्या सुलतानाच्या मदतीस आले. तसेच घोडेस्वारांचा सरदार खानमहंमद याने फिरते राहून ज्या ठिकाणी मदत लागेल त्या ठिकाणी कुमक करावी,[४२] असे ठरले गेले. पाच हजार सैन्यानिशी सरदार हिरोजीराव पाटणकर विजापूर दरबारी आले. परंतु शहाजहान आजारी असल्याबद्दल रोशन बेग हिचे पत्र आले होते[४३] त्यामुळे औरंगजेब लढाई बंद करून सैन्यासह दिल्लीस निघून गेला होता.

**५) नागोजीराव पाटणकर:**

इ.स. १६८६ मध्ये औरंगजेबाने आपला पुत्र शाहजादा अज्जम याचबरोबर मोठे सैन्य देऊन विजापूरचे राज्य घेण्याकरिता पाठविले.[४४] विजापूर येथे त्यासाली भयंकर दुष्काळ पडलेला होता.[४५] त्यामुळे औरंगजेबाने अहमदनगरचा सरदार गाजीउद्दीन याला धान्याचा पुरवठा करण्याचा व सैन्यासह शाहजादा अज्जम याला मदत करण्याचा हुकूम दिला.[४६] गाजीउद्दीन २०००० गोण्या घेऊन मोठया सैन्यानिशी विजापूराकडे निघून गेला.[४७] ही

बातमी विजापूर दरबारात कळताच सुलतानाने आपले सैन्य गाजीउद्दीनवर हल्ला करण्याकरिता पाठविले. हया लढाईत हिरोजीरावाचे पुत्र नागोजीराव पाटणकर यांनी चांगला पराक्रम केला. पुढे नागोजीराव विजापूर राज्याचा अस्त झाल्यावर पाटण येथे येऊन देशमुखीची व्यवस्था पाहू लागले.

**५) चांदजीराव पाटणकर:**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या निघृण हत्येनंतर मराठा राज्याच्या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी रायगडावर संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे, जनार्दनपंत हणमंते, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत अमात्य वगैरे मुत्सदी मंडळी जमली होती.[४८] राजश्री संताजी घोरपडे यांच्याशी सरदार चांदजीराव पाटणकर यांचे चांगले संबंध होते. त्यामुळे सरदार चांदजीराव पाटणकर ही त्यावेळी रायगडावर हजर होते. छत्रपती संभाजी महाराजांची पत्नी महाराणी येसूबाई यांचा विचार घेऊन छत्रपती संभाजी महाराजांचा पुत्र मोठा होईपर्यंत राजाराम महाराजाने राज्यकारभार करावा, असा मार्ग काढण्यात आला. रायगडावर महाराणी येसूबाई व तिचा पुत्र शाहू यांनी राहावे, तसेच राजाराम महाराजांनी आपल्या कुंटूंबासह जिंजीला जावे, असे ठरविण्यात आले.[४९]

इ.स. १६९२ मध्ये जिंजीच्या मोहिमेत सरदार चांदजीराव पाटणकर यांनी मोठा पराक्रम केला. त्यावर छत्रपती राजाराम महाराजांनी संपूर्ण पाटण परगण्याची इनामाची सनद सरदार चांदजीराव पाटणकरांना दिली. ती सनद पुढीलप्रमाणे, '..........तुम्हांस इनाम पुर्वी परगणे पाटणाखाले गांव ११ अकरा व मौजे अडूळ परगणे कराड देह १, येकुन १२ गांव चालत आहेत त्या देखील परगणे पाटण माहाल सारा ईनाम, कुलबाब, कुलकानु हल्लीपट्टी, पेस्तर पट्टी, झाडझाडोरा पडिलेपानासहित, खेरीज हक्कदार व ईनामदार करून माहाल ईनाम दिल्हा असे......'.[५०]

इ.स. १६९३ मध्ये रामचंद्रपंत अमात्य यांचे व्याघ्रगडचे सुभेदार त्रिंबक कृष्ण यांस लिहिलेल्या पत्रात पाटण महालातील ५७ गावांपैकी ३४ गावांचा मोकासा सरदार चादंजीराव पाटणकर यांना दिलेला आहे.[५१] तसेच इ.स. १६९६ च्या एका सनदेनुसार छत्रपती राजाराम महाराज यांनी सरदार चांदजीराव पाटणकर यांना पाटण महालातील उभा मार्ग जकातीच्या कमाविसीचे इनाम वंशपरंपरेने बहाल केले. त्यांच्या कामाचा गौरव करताना महाराजांनी म्हटले आहे की, '.....तुम्ही स्वामीचे वतनी सेवक असून अंत:करर्णापूर्वक स्वामी शेवा करीत आहा, तुमचे विशेष्कारे गोमटे करून चालवणे स्वामीस आगत्य....'.[५२] इ.स. १६९६ मध्ये जिंजी मुक्कामी छत्रपती राजाराम महाराजांनी राजश्री चांदजीराव पाटणकर यांना सातारा प्रांतातील मौजे नाटणे या गावी दोन चावर जमीन इनाम दिली.[५३] तसेच दुसऱ्या एक सनदेने याचवर्षी वाई प्रांतातील कसबे रहिमपूर हया गावी चार चावर जमीन इनाम दिली.[५४]

छत्रपती राजाराम महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाईंनी आपला पुत्र शिवाजी राजे यांना गादीवर बसवून राज्याची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. दरम्यानच्या काळात औरंगजेब बादशहाने मराठयांची राजधानी सातारा किल्ल्यास वेढा घातला होता. किल्ल्यावर प्रचंड हल्ले करून ही तो जिंकून घेण्यास त्याला अपयश आले होते. या तत्कालीन महत्त्वाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या घडामोडीवर मुख्य प्रधान परशुराम त्र्यंबक यांनी राजश्री चांदजीराव पाटणकर यांना इ.स. १७०० मध्ये एक पत्र लिहिले. किल्ला काबीज करण्यासाठी औरंगजेबाने वाटाघाटीचा मार्ग स्वीकारून, आपला सरदार रूहुल्लाखान याच्यामार्फत विठोजी पाटील यास मध्यस्थ म्हणून परशुराम त्र्यंबक याकडे पाठविल्याचा निर्देश या पत्रात आहे. साताऱ्याच्या प्रदेशातील शत्रूंच्या फौजांची रसद मारून काढण्याची महत्त्वाची कामगिरी महाराणी ताराबाई यांनी सरदार चांदजीराव पाटणकर यांच्यावर सोपविलेली होती,[५५] हे हया पत्रावरून स्पष्ट होते.

पुढे जेव्हा छत्रपती राजाराम महाराज जिंजीवरून रायगडला आले व त्यांनी उत्तरेकडील मुलुखाचा बंदोबस्त करण्याकरिता निघाले त्यावेळी सरदार चांदजीराव पाटणकर यांनाही सोबत नेले होते.

**६) रामराव पाटणकर:**

इ.स. १७०७ साली औरंगजेब बादशहाचा अंत झाला. मराठयामध्ये अंतर्गत दुही निर्माण व्हावी याहेतू छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र शाहूची सुटका करण्यात आली. वऱ्हाड व खानदेश येथील मराठे सरदारांस आपल्या भेटीस बोलावून शाहूंनी त्यांना आपल्या बाजूने घेतले. चिकेवाडी मुक्कामी सरदार चांदजीराव पाटणकर यांचे पुत्र राजश्री रामराव पाटणकर व राजश्री सुभानराव पाटणकर हे शाहू महाराजांना भेटले. चिकेवाडीच्या मुक्कामी भेटल्यावर शाहू महाराजांनी सरदार पाटणकरांना पाटण महालीचा इनाम इ.स. १७०८मध्ये पूर्ववत चालू ठेवला.[५६]

महाराणी ताराबाई व शाहू महाराज यांच्यात पुण्याच्या उत्तरेस १५ कोसांवर खेडजवळ युध्द झाले.[५७] महाराणी ताराबाई यांचेकडून राजश्री धनाजी जाधव व प्रतिनिधी होते. परंतु ऐन युध्दप्रसंगी राजश्री धनाजी जाधव आपल्या लवाजम्यासह शाहू महाराजांना येऊन मिळाले. तेव्हा प्रतिनिधी आपल्या सैन्यासह साताऱ्यास पळून गेले.[५८] सरदार रामराव पाटणकर, धनाजी जाधव यांनी चंदन आणि वंदन हे दोन किल्ले हस्तगत केले.[५९] पुढे राजगड किल्ला सर करण्यासाठी सरदार रामराव पाटणकर यांना पाठविले. त्यांनी मोठा पराक्रम करून राजगड ताब्यात घेतला. त्यावेळी छत्रपती शाहू महाराजांनी करवीर इलाख्यापैकी भुदरगड पेठयांतील १०/११ गावंची सरदेशमुखी सरदार रामराव पाटणकरांकडे निर्वेध चालू केली.[६०]

## ७) नागोजीराव पाटणकर:

### अ. कृष्णराव खटावकर यांच्या पाडावात सरदार पाटणकरांचा सहभाग:

सरदार रामराव पाटणकरांच्या मृत्यूनंतर नागोजीराव पाटणकर पाटण महालाचे देशमुख झाले. शाहू महाराजांना भेटून एखादया मोहीमेवर आपणांस पाठविण्याविषयी विनंती केली. त्यावरून महाराजांनी शंभू महादेवांचे डोंगराकडे कृष्णराव खटावकर फार उपद्रव करीत होता, त्या मोहिमेवर बाळाजी विश्वनाथ यांजबरोबर जाण्याचा हुकूम केला. उभय पक्षांची लढाई होऊन सरदार पाटणकरांच्या अतुलनीय कामगिरीमुळे व पराक्रमामुळे बाळाजीचा विजय झाला. खटावकरांस कैद करून महाराजांपुढे आणिले.[६१] खटावकरांने आपल्या अपराधांची क्षमा मागून आपली मुक्तता होण्याविषयी विनंती केली. तेव्हा महाराजांनी त्याच्यावर दया केली व खटाव गांव वंशपरंपरा इनाम करून देऊन त्याला सोडून दिले.[६२]

### ब. सिद्दीचा पाडाव:

कोकणात पेशवा बहिरोपंत पिंगळे यांस महाराणी ताराबाई गटाचा आरमारप्रमुख आंग्रे यांचा बंदोबस्त करण्यास शाहू महाराजांनी पाठविले. परंतु पिंगळे यांचा पराभव होऊन लोहगड व राजमाची किल्ले आंग्रे यांनी जिंकून घेतले. पुढे सरदार नागोजीराव पाटणकर व बाळाजी विश्वनाथ यांना आंग्रे यांचेवर जाण्याचा हुकुम छत्रपती शाहू महाराजांनी केला. बाळाजी विश्वनाथ यांनी मोठया युक्तीने आंग्रे यांना छत्रपती शाहू महाराजांकडे वळविले. यावेळी सिद्दीच्या ताब्यातील प्रदेश आपोआपच शाहू महाराजांकडे आला. त्यामुळे सिद्दीनें आंग्रे यांचेवर स्वारी केली. तेव्हा सरदार नागोजीराव पाटणकर व बाळाजी विश्वनाथ आपल्या सैन्यासह आंग्रे यांच्या मदतीला गेले. सरदार पाटणकरांनी मोठा पराक्रम करून सिद्दीचा पराभव केला.[६३]

**क. दमाजी थोरात यांच्या बंदोबस्तामध्ये सरदार पाटणकरांचा सहभागः**

मराठा सरदारापैकी एक दमाजी थोरात हिंगण गावच्या किल्ल्यातून छत्रपती शाहू महाराजांच्या मुलुखांत उपद्रव करीत असे. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी सचिव नारो शंकर यास पाठविले परंतु सचिवास दमाजी थोरात यांने बंदी बनविले. तेव्हा सरदार नागोजीराव पाटणकर व बाळाजी विश्वनाथ आपल्या सैन्यासह दमाजीवर चाल करून गेले. सरदार पाटणकरांनी दाखविलेल्या अतुलनीय पराक्रमामुळे दमाजीचा पराभव होऊन त्याला कैद करण्यात आले आणि किल्ल्याचा तट पाडून टाकण्यात आला.[६४]

**ड. दिल्ली मोहिमेतील सरदार पाटणकरांची कामगिरीः**

उत्तेरकडील सय्यद बंधूच्या मदतीने फर्रूखसियर बादशाही तख्तावर बसला. दिल्ली दरबारातील सय्यद बंधूचे वर्चस्व सहन होईनासे झाले. तेव्हा बादशहाने सय्यद बंधूपैकी धाकटा हुसेन अल्लीखान याला दक्षिणेचा सुभेदार नेमून त्याची रवानगी केली. पूर्वीचा दक्षिणेकडील सुभेदार दाऊदखान याला गुजरातचा सुभेदार बनविले. पुढे हुसेन अल्लीखान व दाऊदखान यांच्यात संघर्ष झाला. दाऊदखानाचा मोठा पाडाव झाला. त्यावेळी हुसेन अल्लीखानाने छत्रपती शाहू महाराजांशी तह केला. हा तह बादशहाला मान्य झाला नाही. बादशहाची कपटनीती हुसेन अल्लीला समजताच त्याने त्याला पदच्युत करण्याचा निश्चय केला व त्यासाठी मराठयांची मदत मागितली. तेव्हा छत्रपती शाहू महाराजांनी खंडेराव दाभाडे, नागोजीराव पाटणकर व बाळाजी विश्वनाथ यांजबरोबर सैन्य देऊन सय्यदाच्या मदतीला पाठविले.[६५] उभय सैन्यांनी फर्रूखसियर बादशहास ठार मारिले व महंमदशहाला दिल्लीच्या गादीवर बसविले. सरदार नागोजीराव पाटणकर, खंडेराव दाभाडे वगैरे सरदारांनी केलेल्या पराक्रमामुळे मोगलांच्या कैदेतून महाराणी येसूबाई व मराठी माणसांची

सुटका झाली. बादशहाकडून चौथाई व सरदेशमुखी या सनदा मराठयांना मिळविता आल्या.

**इ. कोल्हापूरचे छत्रपती आणि सरदार पाटणकर:**

कोल्हापूरकर छत्रपती संभाजी महाराज यांनी नागोजीराव पाटणकर यांना सोयरिकीविषयी पाठविलेले पत्रातून तत्कालिन सरदारांमध्ये पाटणकरांचे असलेले महत्त्व लक्षात येते. या पत्रातील मजकुरानुसार छत्रपती संभाजी महाराज असे म्हणतात की, '......नागोजीराव पाटणकर यांसी आज्ञा केली यैसीजे तुम्ही विनंती पत्र पाठविले. ते प्रविस्ठ होऊन लिहिले वर्तमान विदीत जाले. सोईरीकेचा शोध राजश्री राणोजी घाटगे यांकडे केला. हे वर्तमान भानजी पवार वाा तून याणी विदीत केला.......'.[६६]

दुसऱ्या एका पत्रात तर्फ तारळे येथील देशमुखीविषयी आज्ञापत्र कोल्हापूरकर छत्रपती संभाजी महाराज नागोजीराव पाटणकर यांना देतात. या आज्ञापत्रात असे म्हणतात की, '........पूर्वी तुम्हाकडील बोलीचाली हुजूर तारले तर्फेचे देसमुखीची आली होती ते सविस्तर स्वामीस निवेदन आहे. यैशास सांप्रत बालाजी देसाई ताा तारले याची देसमुखी अनामत करून हुजूर ठेविली आहे. या मधे तुम्हांस जर काही आपली बोलीचाली करून घेणे असेल तरी पूर्वीलक्षुम खराडा या बराबर तुम्ही सांगोन पाठविली आहे...........'.[६७]

सरदार नागोजीराव पाटणकरांनी पहिले बाजीराव पेशवे यांच्यासोबत अनेक लढायांत सहभाग घेतला. पुढे त्यांनी दंतागिरी व गुणवंतगड या किल्ल्यावर पुन्हा आपली ठाणी वसविली. इ.स. १७४२मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

## ८) धारराव पाटणकरः

सरदार चांदजीराव पाटणकर यांचे बंधू हणमंतराव पाटणकर यांचे पुत्र धारराव पाटणकर हे छत्रपती शाहू महाराजांचे दरबारी कार्यरत होते. अनेक मोहिमांमध्ये सरदार धारराव पाटणकर हे ससैन्य छत्रपती शाहू महाराजांबरोबर होते. इ.स. १७४२—४३ चे छत्रपती शाहू महाराजांनी सरदार धारराव पाटणकर यांना पाठविलेले पत्र उपलब्ध आहे, या पत्रावरून आपणांस सरदार धारराव पाटणकर यांना छत्रपती त्रिचन्नापल्ली लढाईसाठी राजश्री हिंदूराव घोरपडे यांच्यासोबत ससैन्य जाण्याची आज्ञा करताना दिसून येतात. या आज्ञापत्रातील मजकुर पुढीलप्रमाणे, '.....कित्तापत्रें चिटनिशी तीथवार छ.मजकूर राजश्री धारराऊ पाटणकर यांस आज्ञा केली ऐसीजेः—तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ विदित जाहला. महाराजांची आज्ञा घेऊन स्वार जाहला ते राजश्री हिंदुराऊ घोरपडे ममलकत मदार यांची भेट घेतली. पुढे त्रिचन्नापल्लीकडे जाण्याचा विचार आहे म्हणून लिहिले ऐंसीयास निजाम उल्मुलुक त्रिचन्नापल्लीस जाऊन बैसला आहे. तेथील उपराळयास जावयाची आज्ञा राजश्री हिंदुराऊ घोरपडे ममलकतमदार यांस केली आहे. ते फौजसहवर्तमान जातील. त्या समागमे तुम्ही फौजेसहवर्तमान जाऊन तेथील उपराळा करून आपले सेवेचा मजरा करून घेणे म्हणून पत्र....'.[६८]

वरील आज्ञापत्रातून आपणांस असे दिसून येते की, सरदार धारराव पाटणकर यांच्या कर्तृत्वावर छत्रपती शाहू महाराजांना विश्वास होता. तसेच सरदार धारराव पाटणकरांनी राजश्री हिंदूराव घोरपडे यांच्यासोबत ससैन्य जाऊन निजाम उल् मुलुक याचा पराभव करावा, अशी अपेक्षा इथे व्यक्त करताना दिसून येतात. म्हणजेच निजाम उल् मुलुक सारख्या बलाढय शत्रूशी लढण्यासाठी सरदार धारराव पाटणकरांची छत्रपती शाहू महाराज निवड करतात याचाच अर्थ असा की, छत्रपती शाहू महाराजांचा सरदार धारराव पाटणकरांच्या कर्तबगारीवर असलेला गाढा विश्वास आपणांस येथे पहावयास

मिळतो. या युध्दाविषयी अधिक माहिती उपलब्ध नाही, त्यामुळे या युध्दाविषयी अचूक माहिती आपणांस मिळत नाही.

**९) जानराव पाटणकर:**

**अ. श्रीरंगपट्टणची स्वारी:**

इ.स. १७५३ च्या सुमारास नानासाहेब पेशवे यांनी कर्नाटकांत स्वारी करून श्रीरंगपट्टणपर्यंत चाल केली. या स्वारीत नानासाहेब पेशव्यांसोबत सरदार जानराव पाटणकर ही होते. एक हजार स्वारांचे नेतृत्व सरदार जानराव पाटणकरांनी केले होते.[६९] त्यांनी बहुली ओनोरचा किल्ला सर केला.

**ब. उदगीर लढाई व सरदार पाटणकरांचा पराक्रम:**

इ.स. १७६० साली पेशव्यांनी निजामावर स्वारी केली. उदगीर मुक्कामी मोठी लढाई झाली. यात निजामाचा पराभव होऊन ६२ लाखांचा मुलूख मराठयांस मिळाला.[७०] या मोहिमेत सरदार जानराव पाटणकरांनी सहभाग घेतला होता. सरदार जानराव पाटणकर हे सदाशिवराव भाऊंच्या फौजेत होते याचा उल्लेख रघुनाथराव पेशवे यांनी सदाशिवराव भाऊ यांना लिहिलेल्या पत्रात येतो. ते म्हणतात की, '........स्वामी जवल पाटणकर आहेत, घाटगे वगैरे आहेत आम्हा कडील पथके मातबर कोणी आले नाहीत.....'.[७१] या पत्रातील मजकुरावरून असे दिसून येते की, सरदार पाटणकर हे मराठा सैन्यातील मातब्बर सरदार होते.

**क. पानिपतचे युध्द आणि सरदार पाटणकर:**

इ.स. १७६१ मध्ये झालेल्या पानिपतच्या तिसऱ्या युध्दात सरदार जानराव पाटणकर हे सदाशिवराव पेशवे यांच्या सैन्यामध्ये होते. मराठे आणि अहमदशहा अब्दाली यांच्यात झालेल्या पानिपतच्या युध्दात

पेशव्यांच्या चुकीच्या निर्णयामुळे मराठयांचा पराभव झाला. महाराष्ट्रातील तरूणांची एक पिढी या युध्दात मारली गेली होती. सरदार जानराव पाटणकर जखमी अवस्थेत इतर लोकाबरोबर परत आले.

**ड. राक्षसभुव लढाईत सरदार पाटणकरांची कामगिरी:**

इ.स. १७६३ साली रघुनाथरावाने निजामावर स्वारी केली. उभय सैन्यांची गाठ राक्षसभुवन येथे पडली व लढाई सुरू झाली. माधवराव पेशवे युध्दभूमीपासून दोन कोस युध्द वृतांत जाणून घेत होते. रघुनाथरावांचा पराभव होत आहे हे कळताच सरदार जानराव पाटणकर व इतर मराठयांनी निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर यावर चाल केली. यात निजामाचा मोठा पराभव झाला.[७२]

**इ. कर्नाटक मोहिमेतील सरदार पाटणकरांची कामगिरी:**

इ.स. १७६७ साली माधवराव पेशव्यांनी कर्नाटकावर स्वारी केली. या स्वारीत माधवराव पेशव्यांसोबत सरदार जानराव पाटणकर ही होते. माधवरावांनी शेरा, उसकटा प्रांत घेऊन हैदर अलीपासून ३० लक्ष खंडणी व इतर नवाबापासून बहुत द्रव्य घेऊन ते परत आले.[७३]

**ई. सरदार पाटणकरांचे बारभाई कारभाऱ्यांना सहाय्य:**

माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर छत्रपतींनी नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें दिली. परंतु थोडयाच दिवसांनी गारदयांचा मुख्य सुमेरसिंग याने त्यांचा शनिवारवाडयात खून केला. या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सर्व सरदार, मानकरी व मुत्सद्दी कोतवाल चावडींत जमले त्यांत सरदार जानराव पाटणकर व आपाजीराव पाटणकर होते.[७४] पुढे रघुनाथरावांनी स्वत:ला पेशवे म्हणून घोषित केले. तेव्हा रघुनाथरावाचा बंदोबस्त करण्यासाठी कारभाऱ्यांनी हरिपंत फडके यांचेसोबत ३७ हजार स्वार देऊन सोबत सरदार जानराव पाटणकरास पाठविले.[७५] या लढाईत रघुनाथरावांचा पराभव झाला.

सरदार जानराव पाटणकरांनी मोठे शौर्य दाखविले. त्याबद्दल कारभारी मंडळींनी सवाई माधवराव यांचे नावे बहादुरीचे पत्र दिले. त्या पत्रात असे म्हटले की, '........राजश्री दादासाहेब याज कडील व ईकडील फौजेची लढाई जाली. त्यांचा मोड होऊन पळून गेले. तुम्ही सरदार लोकांनी फार चांगली लडाई जमऊन मोठी शर्त केली म्हणून राजश्री हरी बामण याणी लिहिले............'.[७६]

**उ. सरदार पाटणकरांचे सवाई माधवराव पेशव्यांना सहाय्य:**

इ.स. १७७७ मध्ये सवाई माधवराव पेशवे यांचे राजश्री जानराव पाटणकर यांना आपल्या फौजफाटयासह तयार होऊन हुजूर येण्याची आज्ञा करणारे हे पत्र फार महत्त्वाचे आहे. त्यामध्ये पेशवे सरकारची स्वारी तुंगभद्रा उतरून दक्षिण तीरास आल्याचा उल्लेख आहे.[७७] इ.स. १७९५ साली निजामाबरोबर पेशवे यांनी खर्डे येथे मोठी लढाई केली. या लढाईत निजामाचा पराभव झाला. सरदार जानराव पाटणकर या लढाईत सहभागी होते. पुढे इ.स. १८०२ मध्ये बदामीच्या स्वारीत जानराव लढत असता त्यांना वीरमरण आले.

**१०) बाबुराव साळुंखे ऊर्फ पाटणकर:**

१८व्या शतकाच्या उत्तरार्धात बाबुराव साळुंखे ऊर्फ पाटणकर व आनंदराव धुळप यांच्या आरमाराचा वचक युरोपियन जहाजांवर होता. आपल्या जलद आरमारी हालचालीद्वारे त्यांनी इंग्रजांना जेरीस आणले होते. इंग्रजांनी त्यांच्या सोबत सलोख्याचे संबंध ठेवले होते. पेशव्यांतर्फे नाना फडणविसाने आरमारी सुभ्याचा काही अधिकार बाबुराव साळुंखे यांना दिला व आपल्या आरमारी महालाचा खर्च परस्पर भागविणे, असा आदेश दिला.[७८] बाबुराव साळुंखे यांसकडे उत्तर पेशवाई काळात दोन मोठी पाले, चार गुराबे आणि विसाहून अधिक गलबते होती.[७९] चाचेगिरीपासून बचाव करणे, समुद्रात

फुटलेली जहाजे ताब्यात घेणे व समुद्रकिनाऱ्याचे संरक्षण करणे इ. कामे करावी लागत असत.[८०]

दिनांक २६ जानेवारी, १७९१ रोजीच्या एका पत्रात नाना फडणविसांच्या गोवा गव्हर्नर यांस लिहिलेल्या पत्रात बाबुराव साळुंखे यांचा उल्लेख आढळतो. त्या पत्राचा तपशील पुढीलप्रमाणे, '...सदाशिवगड (गोवा) हा आतील सर्व वस्तूंसह बाबुराव साळुंखे यांच्या हवाली करण्याचा हुकूम आपण आपल्या सैन्याला द्यावा.....'.[८१]

**११) नागोजीराव पाटणकर:**

सरदार जानराव पाटणकर यांना संतान नसल्याने कनिष्ठ बंधू द्वारकोजीराव यांचा पुत्र नागोजीराव याला इ.स. १८०२ साली दत्तक घेतले. त्यासंदर्भात पेशवे बाजीराव दुसरे यांनी दत्तक संमती दिल्याचे पत्र रमाबाई व जिजाबाई जानराव पाटणकरांना दिली. त्या पत्रात असे म्हणतात की, '.......जानराव बिन नागोजी सालोखे देशमुख सन सबा समानीमात बदामीचे स्वारीस सरकार कामावर पडिले. त्याचे पोटी पुत्र संतान नाही व दोघी स्त्रिया यांचे संरक्षण झाले पाहिजे वतनास अधिकारी असावा. हे जाणोन पत्र सादर केले असे. तरी बाजी बिन दारकोजी पाटणकर हे आपला कनिष्ठ बंधू देत आहेत तो दतपुत्र घेणे.....'.[८२]

सरदार नागोजीराव पाटणकर यांचा विवाह कोल्हापूरकर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कन्या चिमाबाई आक्कासाहेब यांच्याशी दिनांक २१ जून, १८०८ रोजी संपन्न झाला.[८३] इ.स. १८११साली साताराच्या महाराजांनी इनामदार, जहागीरदार व इतर श्रीमान लोकांची यादी तयार केली, या यादीत सरदार नागोजीराव पाटणकर यांचे नावे ४३ गावे इनाम जहागीर[८४] असल्याबद्दल उल्लेख आढळतो.

इ.स. १८१६ ला कंपनी सरकारच्या कैदेतून त्रिंबकजी डेंगळे निसटून गेल्यावर श्रीमंत बाजीराव दुसरे यांच्यावर दडपण आणून त्रिंबकजीस पकडण्याचा इंग्रजांनी जाहीरनामा प्रसिध्द केला. पेशव्यांनी नामांकित मराठा सरदारांना पत्रे पाठविली त्यामध्ये सरदार नागोजीराव पाटणकर यांचा समावेश होता. सरदार नागोजीराव पाटणकरांना पाठविलेल्या पत्राचा आशय असा की, '........त्रिंबकजी डेगला कंपनी ईंग्रज बहादूर याचे कैदेतून पळून बंड करीत फिरतो. त्याची चौकसी तुम्हाकडे ता ा पाटण माहाल आहे तेथे गावगना करून डेगला म ाा र याचे ठिकाण लाऊन जिंवत अगर मेला सरकारात हवाल करून देइल त्याजला दोन लक्ष रूपये बक्षीस व हजार रूपयाचा गांव ईनाम ईंग्रज बाहादूर याचे विदयमाने दिल्हा जाईल.........'.[८५] वरील पत्रावरून मराठा सत्तेच्या अस्तावेळी सरदार नागोजीराव पाटणकर हे आपली जहागीर पाटण येथे उपभोगताना दिसून येतात. यावरून पेशवाईच्या अस्तावेळी जे नामांकित मराठा सरदार होते त्या सरदारामध्ये पाटणकरांचे स्थान महत्त्वपूर्ण असलेले दिसून येते.

इ.स. १८२२ मध्ये साताऱ्याला छत्रपतींच्या दरबारी असलेल्या निवासी इंग्रज प्रतिनिधी ग्रँट डफ याने छत्रपतींच्या वतीने सरदार पाटणकरांना पाठविलेल्या पत्रात असे म्हटले आहे की, '.......मुरारी रामोसी जमीयेत करून फिरत आहे.....त्याचे बंदोबस्ती करीता श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब यांचे सरकारातून महेरबा रामराव मोहिते वगैरे याज बरोबर लोक देऊन रवाना जाले आहेत.........आपणही या बदल बहूत तऱ्हेने बातमी लाऊन रामोसी याज धरावे.......'.[८६] या पत्रातील आशयावरून सरदार पाटणकर हे छत्रपतीं महाराजांचे विश्वासू व कर्तबगार सरदार असल्यानेच तसे पत्र पाठविले होते, हे दिसून येते.

सरदार नागोजीराव पाटणकर यांच्या कन्या आनंदीबाईसाहेब ऊर्फ ताराबाईसाहेब यांचा विवाह कोल्हापूरचे छत्रपती शहाजी

महाराज ऊर्फ बुवासाहेब यांचेशी झाला. इ.स. १८२२मध्ये सरदार नागोजीराव पाटणकर यांचा मृत्यू झाला.

**१२) व्यंकटराव पाटणकर:**

नागोजीराव पाटणकर यांच्या मृत्यूनंतर व्यंकटराव हे पाटणच्या जहागिरीचा कारभार पाहू लागले. सरदार व्यंकटराव पाटणकरांचा विवाह इ.स. १८३३ मध्ये शिदोजीराव ऊर्फ अप्पासाहेब निंबाळकर यांची कन्या तानीबाई यांच्याशी झाला.[८७] इ.स. १८२३ साली सातारकर छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी पाटणला भेट दिली होती.[८८] तसेच इ.स. १८२६ साली कोल्हापूरकर छत्रपती बुवासाहेब महाराज हे पाटण मुक्कामी आले होते.[८९] यावेळी मोठा दरबार भरवून सरदार व्यंकटराव पाटणकर यांनी छत्रपतींचा सत्कार केला.

**सातारच्या छत्रपतींकडून सरदार पाटणकरांचा गौरव:**

इ.स. १८२७ मध्ये सातारकर छत्रपती प्रतापसिंह महाराज यांनी व्यंकटरावांना पत्र लिहून बंडवाल्याचा बिमोड करण्याच्या सूचना केल्या. त्या पत्रात छत्रपती प्रतापसिंह महाराज असे म्हणतात की, '....बंड वाले लोक पाटण माहालांत येतील तर त्यांसी धरून मारावे. त्यांच्या आश्रियाचे किले जागा वगैरे असल्यास भिंती पाडून टाकाव्या......'.[९०] या वेळी व्यंकटराव पाटणकरांनी बंडवाल्यांचा बंदोबस्त केला. तेव्हा इ.स. १८३० मध्ये छत्रपती प्रतापसिंह महाराज दुसरे आज्ञापत्र लिहून असे म्हणतात की, '.......तुमी मोठया शूरत्वाने बंडवाल्यांचा मोड करून चोहोंकडे स्वस्थता राखिली.........'.[९१]

**१३) रामचंद्रराव पाटणकर:**

सरदार व्यंकटराव पाटणकरांना पुत्रसंतान नसल्यामुळे त्यांचे धाकटे बंधु रामचंद्रराव हे जहागिरीची व्यवस्था पाहू लागले. इ.स. १८४४

मध्ये पन्हाळा किल्ल्यावर बंडवाल्यांनी हल्ला केला. त्यावेळी सरदार रामचंद्रराव पाटणकरांनी महाराजांचे रक्षण केले.

इ.स. १८४६साली सरदार रामचंद्रराव पाटणकर यांचा विवाह कोल्हापूरकर छत्रपती बुवासाहेब यांची कन्या आऊबाई आक्का यांच्याशी झाला. यांसदर्भात सेनापती रामचंद्रराव घोरपडे (दुसरे) यांना पाठविलल्या निमंत्रण पत्रात असा उल्लेख आढळतो की, '...... चिरंजीव आऊबाई आक्का यांचे विवाहाचा निश्चये फाल्गून बहुल पंचमीस सौम्यवारी होऊन वरराज श्री.रामचंद्रराव पाटणकर यासी नेमस्त केले आहेत........'.[९२]

या काळात सरदार पाटणकर यांचा दबदबा महाराष्ट्रात पहावयास मिळतो. सरदार रामचंद्रराव पाटणकर यांचे समोर पहिल्या प्रतीचे सरदार असा हुद्दा लिहिला जात असे.[९३] इ.स. १८६६ मध्ये रामचंद्रराव पाटणकर यांचा पुत्र नागोजीराव पाटणकर यांना कोल्हापूरचे श्रीमंत छत्रपती बाबासाहेब महाराज यांनी दत्तक घेतले. सरदार रामचंद्रराव पाटणकर यांचा मृत्यू इ.स. १८६८मध्ये झाला.

**१४) छत्रपती राजाराम महाराज ऊर्फ नागोजीराव पाटणकर:**

सरदार रामचंद्रराव पाटणकर आणि आऊबाई आक्का यांना इ.स. १८५० मध्ये एक पुत्र झाला. त्याचे नाव नागोजीराव असे ठेवण्यात आले. इ.स. १८५२ मध्ये आऊबाई आक्का यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र नागोजीराव कोल्हापूरकर छत्रपती शिवाजी तिसरे यांचेजवळ राहू लागले. इ.स. १८६५ मध्ये छत्रपती शिवाजी तिसरे यांनी दरबार भरवून नागोजीराव यांना साडेतीन वस्त्रे देऊन 'मनसूबबहाद्दूर' असा किताब दिला.[९४]

इ.स. १८६६ साली छत्रपती शिवाजी तिसरे यांना पुत्रसंतान नसल्याने आपले भाचे नागोजीराव पाटणकर यांना दत्तक घेतले आणि छत्रपती राजाराम महाराज असे त्यांचे नामकरण करण्यात आले. त्यावेळी त्यांचे

वय अवघे १६ वर्षाचे होते. मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर सर वालटर फ्रियर यांनी छत्रपती राजाराम महाराज यांना गादीवर बसविल्याची घोषणा केली.[९५] पुणे येथे दरबार भरवून ब्रिटीश सरकारकडून अधिकार निदर्शक पोषाख देण्यात आला.

दिनांक २१ फेब्रुवारी, १८७० रोजी डयुक ऑफ एडिंवरोच्या स्वागत समारंभासाठी महाराज मुंबईला गेले.[९६] येथून इंग्लंडला प्रवास करावा, असा महाराजांनी निर्णय घेतला. दिनांक २२ मे, १८७० रोजी महाराज, त्यांचे गार्डियन मि. वेस्ट, त्यांचा पार्शी टयुटर जमशेटजी नौराजी ऊनवाला, गणपतराव ऊर्फ नानासाहेब इंगळे, एक हकिम आणि काही नोकर मिळून ११ लोक प्रवासाला मुंबईहून इंग्लंडला निघाले.[९७] दिनांक १ नोव्हेंबर, १८७० रोजी ते परत मायदेशी येण्यास निघाले. इन्सब्रुक येथे त्यांची प्रकृती बिघडण्यास सुरूवात झाली. अखेरीस दिनांक ३० नोव्हेंबर, १८७० रोजी फ्लॉरेन्स शहरी वयाच्या २०व्या वर्षी त्यांचे निधन झाले.[९८]

**१५) जोत्याजीराव ऊर्फ नागोजीराव ऊर्फ बाबासाहेब पाटणकर:**

सरदार रामचंद्रराव पाटणकर यांचा मृत्यूपूर्वी बाजीराव पाटणकर यांचे पुत्र जोत्याजीराव यांना दिनांक २९ मे, १८६८मध्ये दत्तक घेतले[९९] आणि त्यांचे नागोजीराव ऊर्फ बाबासाहेब असे नामकरण केले. सरदार बाबासाहेब पाटणकर हे लहानपणापासून कोल्हापूरला रामचंद्रराव पाटणकर यांच्या वाडयात रहात होते. त्यामुळे त्यांचे कोल्हापूरच्या छत्रपती यांच्या वाडयात येणे जाणे होते. त्यांचे शिक्षण छत्रपती बाबासाहेब महाराजांनी स्थापन केलेल्या गणेशबागेत झाले. इ.स. १८७३ मध्ये मुंबई सरकारने ठराव करून त्यांचे नाव पहिल्या प्रतीच्या सरदारांच्या पटात पूर्वीप्रमाणे दाखल केले.[१००]

इ.स. १९०६ मध्ये बाबासाहेब पाटणकर यांचा मृत्यू झाला. सरदार बाबासाहेब पाटणकर यांनी पाटण महालामध्ये अनेक

समाजोपयोगी कामे केलेली दिसून येतात. सरदार बाबासाहेब पाटणकरांच्या काळात शाळा, दवाखाना, पिण्याच्या पाण्यासाठी विहिर, शासकीय कार्यालये स्थापन केलेले दिसून येतात. सध्याचा शिक्का मॅन्शन हा वाडासुध्दा सरदार बाबासाहेब पाटणकरांच्या काळात बांधलेला दिसून येतो.

**सरदार पाटणकर घराण्यांच्या विविध शाखा:**

**१) शिक्केकरी वाडा, पाटण:**

इ.स. १६९२मध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी सरदार चांदजीराव पाटणकरांना जिंजीच्या मोहिमेत मोठा पराक्रम केल्याबद्दल संपूर्ण पाटण परगण्याची इनामाची सनद दिली होती. सरदार चांदजीराव पाटणकर हे शिक्केकरी वाडयाचे मुळ संस्थापक मानले जातात. सरदार पाटणकरांची थोरली पाती म्हणून शिक्केकरी वाडयाला ओळखले जाते. सरदार बाबासाहेब पाटणकरांनी या वाडयाच्या मूळ जागेवर इ.स. १८९१ मध्ये अंदाजे ७० हजार रूपये खर्च करून वाडा उभा केला.[१०१] आजही हा वाडा 'शिक्का मॅन्शन' म्हणून ओळखला जातो.

**२) बकुळीचा वाडा, पाटण:**

सरदार चांदजीराव पाटणकर यांना तीन मुले होती. थोरले रामराव शिक्केकरी वाडयात राहिले. तर द्वितीय पुत्र सुभानराव हे बकुळीच्या वाडयाचे संस्थापक मानले जातात.[१०२] हा वाडा कधी बांधला, याविषयी अधिक माहिती उपलब्ध नाही.

**३) टेकावरचा वाडा, पाटण:**

सरदार चांदजीराव पाटणकर यांना तीन मुले होती. त्यांचे तृतीय पुत्र द्वारकोजीराव पाटणकर हे बकुळीच्या वाडयात रहात होते. द्वारकोजीराव पाटणकर यांचे द्वितीय पुत्र बाजीराव पाटणकर आणि याच

बाजीराव पाटणकरांचे जेष्ठ पुत्र द्वारकोजीराव पाटणकर हे टेकावरचा वाडा या घराण्याचे मूळ संस्थापक आहेत.[१०३] आजसुध्दा यांचे वंशज येथे वास्तव्यास असलेले दिसून येतात.

**४) बिबी शाखा :**

सरदार चांदजीराव पाटणकर यांना तीन मुले होती. त्यांचे तृतीय पुत्र द्वारकोजीराव पाटणकर हे बकुळीच्या वाडयात रहात होते. द्वारकोजीराव पाटणकर यांचे द्वितीय पुत्र बाजीराव पाटणकर आणि बाजीराव पाटणकरांचे द्वितीय पुत्र सखारामराव पाटणकर हे बिबी शाखेचे संस्थापक आहेत.[१०४] आजसुध्दा येथे आपणांस सरदार पाटणकरांचा वाडा पहावयास मिळतो.

**५) केर शाखा :**

सरदार चांदजीराव पाटणकर यांना तीन मुले होती. त्यांचे तृतीय पुत्र द्वारकोजीराव पाटणकर हे बकुळीच्या वाडयात रहात होते. द्वारकोजीराव पाटणकर यांचे द्वितीय पुत्र बाजीराव पाटणकर आणि बाजीराव पाटणकरांचे चतुर्थ पुत्र जोत्याजीराव पाटणकर यांनी केर येथे सरदार पाटणकरांची शाखा स्थापन केली होती.[१०५] आजसुध्दा येथे आपणांस सरदार पाटणकरांचा वाडा पहावयास मिळतो.

**६) रामपूर शाखा :**

सरदार चांदजीराव पाटणकर यांचे कनिष्ठ बंधू हणमंतराव पाटणकर यांनी रामपूर शाखेची स्थापना केली. छत्रपती राजाराम महाराजांनी सरदार हणमंतराव पाटणकर यांना समशेर बहादूर हा किताब दिला होता.[१०६] रामपूर शाखेचे मूळपुरूष म्हणून सरदार हणमंतराव पाटणकरांना ओळखले जाते. रामपूर शाखेला सरदार पाटणकर घराण्यांची धाकटी पाती

म्हणून ओळखले जाते. आजसुध्दा येथे आपणांस सरदार पाटणकरांचा वाडा पहावयास मिळतो.

**७) दिवशी बु. शाखा :**

रामपूर शाखेचे मूळपुरूष सरदार हणमंतराव पाटणकर यांचे तृतीय पुत्र धारराव पाटणकर हे पराक्रमी होते. त्यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या काळात आपल्या पराक्रमाच्या जोरावर छत्रपती शाहू महाराजांचा विश्वास संपादन केला होता. सरदार धारराव पाटणकरांचे जेष्ठ पुत्र बहिरजीराव पाटणकर आणि याच बहिरजीराव पाटणकर यांचे जेष्ठ पुत्र धारराव पाटणकर यांना दिवशी बु. येथील जमीन इनाम मिळाली होती. त्यांनी दिवशी बु. येथे वाडा बांधून ते येथील कारभार पाहू लागले. सरदार धारराव बहिरजीराव पाटणकर हे दिवशी बु. शाखेचे संस्थापक आहेत.[१०७] आजसुध्दा येथे सरदार पाटणकरांचे वंशज पहावयास मिळतात आणि वंशपरंपरेने मिळालेल्या इनाम जमिनी कसताना, दिसून येतात.

**८) सावंतवाडी शाखा:**

शिक्केकरी वाडयातील सरदार चांदजीराव पाटणकर यांचे पाचवे वंशज सरदार व्यंकटराव नागोजीराव पाटणकर हे सावंतवाडी संस्थानचे खासगी कारभारी होते.[१०८] सरदार व्यंकटराव पाटणकरांना सावंतवाडी संस्थानातून सरदारकी व मेहमान हा किताब बहाल करण्यात आला होता. सरदार व्यंकटराव पाटणकर हे सावंतवाडी येथे वास्तव्यास होते. सरदार व्यंकटराव पाटणकर हे सावंतवाडी शाखेचे संस्थापक होते.[१०९] त्यांच्या काळातच खासकील वाडयाचे बांधकाम करण्यात आले होते. आज सावंतवाडी येथे सरदार पाटणकरांचा घराण्याचा वंशविस्तार झालेला दिसून येतो.

**९) सातभाई पाटणकर शाखा:**

रामपूर शाखेचे मूळपुरूष सरदार हणमंतराव पाटणकर यांचे द्वितीय पुत्र द्वारकोजीराव पाटणकर हे पराक्रमी होते. द्वारकोजीराव पाटणकर यांना रामराव, लक्ष्मणराव, बाबुराव, राघुजीराव, बाळोजीराव, बाजीराव, जयरामराव असे एकूण सात पुत्र होते. त्यामुळे या घराण्याला सातभाई पाटणकर घराणे असे संबोधले जात होते.[११०] यांचे वास्तव्य जांभूळवन येथे होते.

**१०) मणदुरे शाखा:**

टेकावरील वाडा शाखेचे मूळपुरूष सरदार द्वारकोजीराव पाटणकर होते. त्यांचे जेष्ठ पुत्र बाजीराव हे कर्तबगार होते. सरदार पाटणकर यांना मणदुरे येथे वतनी जमीन मिळाली होती. सरदार खळोजीराव पाटणकर हे मौजे मणदुरे येथील वतनदार होते. यांनीच मणदुरे शाखेची स्थापना केली.[१११] आजसुध्दा येथे सरदार खळोजी पाटणकरांचा वाडा पहावयास मिळतो. या वाडयाला हुजूरवाडा असेही म्हटले जाते.

**११) वाजेगांव शाखा:**

सरदार नारायणराव पाटणकर यांनी हुजूरवाडयातून वागोजीराव पाटणकरांस दत्तक घेतले आणि सरदार वागोजीराव पाटणकर यांना मौजे वाजेगांव हे वतन दिले होते. सरदार वागोजीराव पाटणकर हेच वाजेगांव शाखेचे संस्थापक होते.[११२] सद्यस्थितीला मौजे वाजेगांव हे कोयना धरणामुळे विस्थापित झाले आहे. या घराण्यातील वंशज गांधी टेकडी, पाटण येथे वास्तव्यास असलेले दिसून येतात.

**१२) दिवशी खु. शाखा:**

शिक्केकरी वाडयातील चांदजीराव पाटणकर यांचे सहावे वंशज सरदार नागोजीराव रामचंद्रराव पाटणकर हे दिवशी खु. या गावचे

वतनदार होते. दिवशी खु. येथील कारभार सुरळित करण्यासाठी सरदार नागोजीराव पाटणकर यांनी दिवशी खु. येथे प्रशस्त वाडा बांधला आणि तेथून ते दिवशी खु. व इतर आसपासच्या वतनाचा कारभार पाहत होते.[११३]

**१३) ग्वाल्हेर शाखा:**

रामपूर शाखेचे मूळपुरूष हणमंतराव पाटणकर यांचे वंशज सरदार रामचंद्रराव पाटणकर हे ग्वाल्हेर शाखेचे मूळपुरूष होते. सरदार रामचंद्रराव पाटणकर यांचा विवाह ग्वाल्हेर संस्थानच्या सौ.बायजाबाई शिंदे यांच्या कन्येशी इ.स. १८१६मध्ये झाला होता. या विवाहानंतर सरदार रामचंद्रराव पाटणकर यांना ग्वाल्हेर संस्थानकडून दरसाल सव्वा लाख रूपयांची जहागिरी मिळाली होती.[११४] या जहागीरींचा कारभार पहाण्यासाठी सरदार रामचंद्रराव पाटणकर हे ग्वाल्हेर मुक्कामी होते.

**उपसंहार:**

शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज, पेशवाईच्या काळात स्वराज्य रक्षणासाठी अनेक मराठा घराण्यांनी पिढयांनपिढया मोलाचे योगदान दिलेले आहे. या योगदानामध्ये सरदार पाटणकर घराण्याचे योगदान अनन्यसाधारण आहे. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये या घराण्यांच्या पहिल्या प्रतीच्या सरदारांत या घराण्याचा समावेश होतो. बादशाही अंमलापासून सातारा आणि कोल्हापूर या दोन्ही घराण्यांशी सरदार पाटणकर घराण्यांचा निकटचा संबंध होता. शहाजीराज्यांच्या विरोधात मोगल बादशहाचा आदेश असतानाही तो आदेश डावलून शहाजीराजांशी स्नेह प्रस्थापित केलेला दिसून येतो. शिवाजी महाराजांच्या जावळी प्रकरणानंतर या घराण्याचा मोठया प्रमाणात उदय झालेला दिसून येतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्नाटक मोहिमेत या घराण्यातील यशवंतराव पाटणकर सहभागी होऊन त्यांना तेथे वीरमरण आलेले दिसून येते.

तसे सांत्वनपर पत्र छत्रपती शिवाजी महाराजांनी बाळाजीराव व चांदजीराव यांना लिहिलेले दिसते.

या घराण्यांतील मूळ पुरूषांनी वतने आणि जहागिरी युक्तीने आणि मोठया शौर्याने संपादन केली. इ.स. १५१० मध्ये बहामनी सुलतानाकडून सरदार नागोजीराव साळुंखे यांनी दंतागिरी आणि गुणवंतगडाची देशमुखी मिळविली. इ.स. १५७२मध्ये जोत्याजीराव साळुंखे यांनी पाटण महालाच्या देशमुखीचे वतन विजापूरच्या सुलतानाकडून मिळविले. इ.स. १६९०मध्ये सरदार चांदजीराव पाटणकर यांनी छत्रपती राजाराम महाराजांकडून पाटण महालपैकी अकरा गांवे व कऱ्हाड तालुक्यातील एक गांव अशी बारा गावे संपादन केलेली दिसून येतात. पुढे इ.स. १६९२ मध्ये सरदार चांदजीराव पाटणकर याच्या पराक्रमावर खुश होऊन छत्रपती राजाराम महाराजांनी संपूर्ण पाटण महाल इनाम दिला होता. इ.स. १७०८ मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी सरदार रामराव पाटणकरांना करवीर इलाख्यातील भूदरगड पेटयातील ११ गांवची सरदेशमुखी बहाल केलेली दिसून येते.

सरदार पाटणकर घराण्याने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर मराठा इतिहासामध्ये आपले एक वेगळे स्थान निर्माण केले. आपला शांत, संयमी आणि आवश्यक त्याठिकाणी तितकाच आक्रमकपणा रणागंणावर दाखवून अनेक युध्दामध्ये युक्तीने आणि पराक्रमाच्या जोरावर शत्रूवर विजय मिळविले. महाराष्ट्रभर किंबहुना उत्तरेकडे वावर असतानाही आपली परंपरागत देशमुखी असलेले पाटण महाल यावरही लक्ष ठेवले. तेथील प्रजेचे रक्षण, त्यांना त्रास देणाऱ्या बंडवाल्यांचा नायनाट अशा विविध प्रसंगातून त्यांचा प्रजेविषयी असलेला कनवळा दिसून येतो. युध्दमोहिमा हया फक्त द्रव्यार्जनाच्या दृष्टीने न पाहता स्वराज्यनिष्ठा, स्वामीनिष्ठा या जोरावर ते जवळजवळ प्रत्येक युध्दमोहिमांमध्ये यशस्वी होत गेले.

सरदार पाटणकर घराण्याच्या कर्तबगारी व कर्तृत्वामुळे त्यांच्याविषयी छत्रपती घराणे आणि महाराष्ट्रातील इतर अनेक घराण्यांमध्ये आदरांची भावना होती. सरदार पाटणकर घराण्यांचे ऐतिहासिक स्थान तसेच त्यांचा वसा आणि वारसा यामुळे तत्कालिन महत्त्वपूर्ण घराण्यांशी वैवाहिक संबंध प्रस्थापित झाले. या संबंधाद्वारे त्यांनी महाराष्ट्रात एक भक्कम मराठा सरदारांची फळी उभारलेली दिसून येते. कोल्हापूरच्या गादीवर छत्रपती राजाराम महाराज यांना कारभार करण्यास कमी कालावधी मिळाला असला तरी त्यांनी आपल्या अंगभूत चिकित्सक वृत्तीच्या जोरावर कला व विद्या या क्षेत्रात त्यांनी आपली विशेष ओळख निर्माण केली किंबहुना राजर्षी शाहूच्या कारकीर्द बहरण्यासाठी तशा प्रकारची पार्श्वभूमी निर्माण केलेली दिसून येते. हिंदू धर्मातील अनेक जुन्या रूढी परंपरा यांना बगल देऊन परदेशवारी सुध्दा केलेली दिसून येते. यातून त्यांचे पुरोगामी विचार आपणांस पाहावयास मिळतात.

थोडक्यात सरदार पाटणकर आणि यश हे समीकरण आपणांस मराठा कालखंडामध्ये पाहावयास मिळते. छत्रपती राजाराम महाराज, छत्रपती शाहू महाराज, बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव पेशवे, सदाशिवराव पेशवे, रघुनाथराव पेशवे, माधवराव पेशवे, सवाई माधवराव पेशवे, बारभाई कारभारी मंडळींना सरदार पाटणकर घराणे नेहमी जवळचे वाटले. कायम मराठा स्वराज्याशी एकनिष्ठ राहिल्याने अनेक शासनकर्ते या घराण्यावर अवंलबून राहत. पेशवाई कालखंडामध्ये अनेक महत्त्वाच्या घडामोडीचे साक्षीदार बनण्याचे भाग्य या घराण्याला लाभलेले दिसून येते, असे असले तरीही सरदार पाटणकर घराण्याचे कार्य दुर्लक्षित राहिल्याचे दिसून येते.

सरदार पाटणकर कुंटूबियात अनेक कर्तबगार, पराक्रमी पुरूष जन्मास आले होते. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी सरदार पाटणकर घराण्याचा वंशविस्तार केलेला दिसून येतो. जिथे संधी मिळेल, तिथे सरदार पाटणकरांनी आपले कर्तृत्व सिध्द केले होते.

## -: टीपा व संदर्भ :-

१) प्रा.डी.डी.चव्हाण, *‘क्षत्रिय कुलावतंस चालुक्य—सोळंखी—साळुंखे ऊर्फ श्रीमंत सरदार पाटणकर घराण्याचा इतिहास’*, श्रीराम प्रकाशन, पाटण, सुधारित द्वितीय आवृत्ती, ८ एप्रिल, २०१४, पान नं. २८.

२) कित्ता.

३) कित्ता, पान नं. २९.

४) कित्ता.

५) कित्ता.

६) सुनिल द. दापुरकर, *‘श्रीमंत सरदार पाटणकर हुजुरवाडेकर (चाालुक्य ऊर्फ साळुंखे) क्षत्रिय कुळाचा इतिहास व ऐतिहासिक कागदपत्रे’*, गगनगिरी प्रकाशन, गगनगिरी, प्रथमावृत्ती, २००३, पान नं. १०३.

७) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं.३०.

८) कित्ता, पान नं. ३२.

९) कित्ता, पान नं. ३५.

१०) कित्ता, पान नं. ३६ व ३७.

११) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. १०३.

१२) कित्ता.

१३) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं.९२.

१४) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. १०५.

१५) कित्ता, पान नं. १०३.

१६) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं.९७.

१७) कित्ता, पान नं. ९८.

१८) कित्ता.

१९) कित्ता.

२०) कित्ता.

२१) कित्ता, पान नं. ९९.

२२) कित्ता.

२३) कित्ता, पान नं. १०१.

२४) मुलाखत, श्री.याज्ञसेन पाटणकर, दि.

२५) कित्ता.

२६) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, _क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ_, पान नं. १०४.

२७) कित्ता, पान नं. १०७.

२८) www.google.com

२९) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.पा.

३०) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, _श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का_, पान नं. १०५.

३१) पूर्वोक्त, मुलाखत, श्री.या.पा.

३२) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, _क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ_, पान नं. १०६.

३३) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, _श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का_, पान नं. १०६.

३४) कित्ता.

३५) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, _क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ_, पान नं. १०७.

३६) कित्ता.

३७) कित्ता, पान नं. १०८.

३८) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, _श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का_, पान नं. १०६.

३९) कित्ता, पान नं. १०७.

४०) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, _क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ_, पान नं. १०९.

४१) कित्ता.

४२) कित्ता, पान नं. ११०.

४३) कित्ता.

४४) कित्ता.

४५) कित्ता.

४६) कित्ता.

४७) कित्ता.

४८) कित्ता, पान नं. ११४.

४९) कित्ता.

५०) इनाम कमिशन, रू.क्र.३५० (अ), शराकती दुमालदार रेकॉर्ड, पुणे पुराभिलेखागार (पेशवे दप्तर), पुणे.

५१) शिवकालीन कागदपत्र, संपा. व्ही.जी.खोबरेकर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई, पृ.१८८ ते १९०.

५२) कित्ता, पृ.१९४.

५३) कित्ता, पृ.१९३.

५४) कित्ता, पृ.१९२.

५५) कित्ता, पृ.१९६ ते १९७.

५६) रू.क्र.१, पु.क्र.१, पत्र क्र. १३६२०, सरदार पाटणकर दप्तर, मुंबई पुराभिलेखागार विभाग, मुंबई.

५७) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १२२.

५८) कित्ता.

५९) कित्ता.

६०) कित्ता.

६१) कित्ता, पान नं. १२३.

६२) कित्ता.

६३) www.google.com

६४) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १२३ ते १२४.

६५) कित्ता, पान नं. १२५.

६६) रू.क्र.१, पु.क्र.१, पत्र क्र. १९, स.पा.द, मुं.पु.वि.मुं.

६७) रू.क्र.१, पु.क्र.३, पत्र क्र. १९, स.पा.द, मुं.पु.वि.मुं.

६८) ग.चि.वाड, पत्र क्र. ७३, छत्रपती शाहू महाराजांची रोजनिशी.

६९) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १२८.

७०) कित्ता.

७१) लेखांक ५९, पान ४४, सरदेसाई खंड १, उद्गीरची लढाई (द बॅटल ऑफ उद्गीर), पुणे पुराभिलेखागर (पेशवे दप्तर), पुणे.

७२) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १३१.

७३) कित्ता, पान नं. १३२.

७४) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ५५.

७५) कित्ता.

७६) रू.क्र.१, पु.क्र.३, पान नं. ३६० ते ३६१, स.पा.द, मुं.पु.वि.मुं.

७७) कित्ता, पान नं. ३६२.

७८) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, *श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का*, पान नं. ६०.

७९) कित्ता.

८०) कित्ता.

८१) कित्ता, पान नं. ६२.

८२) रू.क्र.१, पु.क्र.४, प.क्र.१३६२०, पान नं.३९३, स.पा.द, मुं.पु.वि.मुं.

८३) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १३६.

८४) रू.नं. ३६७, फेरिस्त, सातारा दप्तर.

८५) पूर्वोक्त, रू.क्र.१, पु.क्र.४, स.पा.द, मुं.पु.वि.मुं.

८६) कित्ता.

८७) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, *क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ*, पान नं. १३४.

८८) कित्ता.

८९) कित्ता.

९०) कित्ता, पान नं. १३७.

९१) कित्ता.

९२) पृ.क्र. ९२२, सेनापती दप्तर दि. ४ मार्च, १८४६.

९३) पान नं. ३०२, स्टॅटिस्टिकल रिपोर्ट, मुंबई सरकार.

९४) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ, पान नं. १३९.

९५) कित्ता, पान नं. १४४.

९६) कित्ता, पान नं. १४६.

९७) कित्ता, पान नं. १४७.

९८) कित्ता, पान नं. १४८.

९९) कित्ता, पान नं. १५१.

१००) पृ.क्र. ६६४, बॉम्बे गॅझेट, बॉम्बे.

१०१) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ, वंशावळ.

१०२) कित्ता.

१०३) कित्ता.

१०४) कित्ता.

१०५) कित्ता.

१०६) कित्ता, पान नं. ३४८.

१०७) कित्ता, वंशावळ.

१०८) पूर्वोक्त, सुनिल द. दापुरकर, श्री.स.पा.हु.क्ष.कु.इ.व.ऐ.का, पान नं. ७३.

१०९) कित्ता, पान नं. ७२.

११०) पूर्वोक्त, प्रा.डी.डी.चव्हाण, क्ष.कु.चा.सो.सा.श्री.स.पा.घ.इ, वंशावळ.

१११) कित्ता.

११२) कित्ता.

११३) कित्ता.

११४) कित्ता.